म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २४००
REFBK-0024116
REFBK-0024116

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

...ली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
...त घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा
...ी लागेल.

APR 1984
JUL 1984
EP 1984
1984
1984
1985
985
5

22 JUN 1986
25 JUN 1986
23 ... 1986
22 JUL 1987
2 SEP 1987
7 OCT 1987
31 JUL 1988

(क्रु. मा. प.)
५०००-१२-८२

संदर्भ काव्य
२५००
२४११६
१८/२/८४

# एल्गार

सुरेश भट

REFBK-0024116
REFBK-0024116

बहुमत प्रकाशन

बहुमत प्रकाशन : २

प्रकाशक
सौ. पुष्पा सुरेश भट
बहुमत प्रकाशन
रामकृष्ण आश्रमाजवळ
धनतोली, नागपूर
४४० ०१२

© सुरेश भट

मूल्य
पंचवीस रुपये

मुद्रक
मधुसूदन पां. वनहट्टी
नारायण मुद्रणालय
२२४ टिकेकर रोड
धनतोली, नागपूर
४४० ०१२

मलपृष्ठावरील छायाचित्र
इरशाद हाशमी
१५ 'अल्-हिलाल'
वान्द्रे रिक्लेमेशन
वान्द्र (पश्चिम)
मुंबई ४४० ०५०

वेष्टन
सुभाष अवचट
२०३८ सदाशिवपेठ
टिळकरोड, पुणे
४११ ०३०

वेष्टन छपाई
नाग मुद्रणालय
रुईकर मार्ग, नागपूर
४४० ००२

अरविंद पाटील
वली सिद्दीक़ी
यांस—

स्वागतासाठीच माझ्या भुंकले ते आदराने
थुंकले तोंडावरी तो केवढा सत्कार होता !

२५०० ग्रा. क्र. २७११६ काव्य १७/४५ शाखा (स्थळ प्रत)

# कैफियत

आज मी "एल्गार" हा माझा तिसरा काव्यसंग्रह महाराष्ट्राच्या हवाली करीत आहे. हा काव्यसंग्रह मराठी रसिकांच्या सुपूर्द करून मी एका मोठया जबाबदारीतून मोकळा झालेलो आहे. ह्या महागाईच्या दिवसात स्वतःच कवी आणि प्रकाशक असल्यावर माणसाला किती कटकटी आणि आर्थिक विवंचनांना तोंड द्यावे लागते, हे ज्याचे त्यालाच ठाऊक.

ह्या माझ्या "एल्गार" काव्यसंग्रहात काही मोजके अपवाद सोडून बहुतेक सर्व गझलाच आहेत. मला अत्यंत आवडलेल्या माझ्या "एल्गार" ह्या गझलेचे नाव मी ह्या काव्यसंग्रहाला दिलेले आहे. मी ती गझल लिहिली तेव्हाच मी ह्या काव्यसंग्रहाचा नामकरणविधी उरकून टाकला.

मराठीत "एल्गार" ह्या शब्दाचा अर्थ "जोराचा हल्ला" असा होतो. हा शब्द मूळ तुर्की आहे. तुर्कीत "यल्गार" म्हणतात.

**हा माझा "एल्गार" काव्यसंग्रह आपले नाव राखतो की नाही, हे आता मराठी रसिकांनी ठरवायचे आहे.**

मराठी गझलेचा विचार करतांना उर्दू भाषेतील "नजाकत" मराठीत येऊच शकत नाही, असे म्हणणारे काही लोक आढळतात. आणि फार तर देवनागरी लिपीपुरताच उर्दू काव्याशी संबंध असलेले अनेक महाभाग मराठी गझलेला उर्दू गझलेची भ्रष्ट नक्कल म्हणतात. माझा हा काव्यसंग्रह वाचल्यानंतर हा आरोप कितपत खरा आहे, हे मराठी रसिकांनीच ठरवावे.

वास्तविक मराठी भाषेला नजाकतीची गरजच नाही. ज्या वेळी उर्दूचा जन्मही झालेला नव्हता, त्या वेळी मराठीत "ज्ञानेश्वरी" आणि "अमृतानुभव" ह्या सारखे ग्रंथ लिहिले गेले. उर्दूच कशाला, जगातील कोणत्याही भाषेत मराठी भाषेला "नजाकत" देण्याचे सामर्थ्य नाही. **आपल्याच मायबोलीचे सामर्थ्य आम्हाला ठाऊक नसते, हे आमचे करंटेपण आहे.** वाचायला किंवा ऐकायला लुसलुशीत वाटणारा शब्द वापरण्याची एक शब्दखोर सवय आम्हाला जडलेली आहे, म्हणून आम्ही मराठी भाषा वळवू शकत नाही, जे सांगायचे आहे ते आणि तेवढेच नेमके सांगू शकत नाही. आणि मग एकमेकांच्या पाठी थोपटणे किंवा थोपटवून घेण्यापलिकडे आम्ही काहीही करू शकत नाही.

पण कवीपेक्षाही सामान्य मराठी माणसाची भाषा अधिक समृद्ध असते. मानवी संवेदनांमुळे होणारी त्याची प्रतिक्रिया अधिक तीव्र, सहज व प्रामाणिक असते. त्याची शब्दांची जाण अधिक सूक्ष्म व प्रखर असते. हा माझा स्वतःचा अनुभव आहे. आणि गेल्या कित्येक वर्षांपासून मी हे अनुभवले आहे की, **आपल्या भावना, संवेदना आणि सुखदुःखे मराठीसारख्या मराठी भाषेत नेमक्या अचूक प्रभावी शब्दात बोलून दाखविणाऱ्या कवीचे मराठी माणसे नेहमीच स्वागत करतात.**

गझलेचा विचार करताना आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, ज्याप्रमाणे मोटारकारची यंत्ररचना कोणत्याही देशाच्या मालकीची नसते, त्याचप्रमाणे **गझल हा काव्यप्रकार कोणत्याही भाषेच्या मालकीचा नाही.** गझल अरबीतून फारसीत आली. फारसीभाषिक इराण्यांनी खऱ्या अर्थाने तिचा विकास केला, आणि मग सुमारे ४०० वर्षांपूर्वी बाल्यावस्थतील उर्दू भाषेत फारसीतून गझल आली.

आज तुर्की, पंजाबी, सिंधी, पश्तो, हिंदी आणि हिंदीच्याच बोलभाषा असलेल्या अवधी, व्रज, भोजपुरी इत्यादींत गझला लिहिल्या जात आहेत. गेल्या ५० वर्षांपासून गुजरातीत गझल एकजीव झालेली आहे. आणि आता महाराष्ट्रानेही उशीरा का होईना, पण गझलेचा स्वीकार केलेला आहे.

## गझल म्हणजे काय ?

**एकाच वृत्तातील, एकच यमक (काफिया) व अन्त्ययमक (रदीफ) असलेल्या प्रत्येकी २–२ ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझल.**

गझलेमधील ह्या प्रत्येक दोन ओळींच्या कवितेला आपण "शेर" म्हणतो. कुणी शेराला "द्विपदी" म्हणतात. गझलेतील प्रत्येक शेर हा आपल्या जागी एक संपूर्ण अभिव्यक्ती असलेली स्वतंत्र व सार्वभौम कविताच असते.

नेहमीची कविता सलग असते. ती उलगडत जाते. **पण गझल उलगडत नसते.** एकाच गझलेत विविध विषय हाताळले जाऊ शकतात किंवा एकच संवेदना, एकच भाव किंवा एकच मूड असलेले सर्वच्या सर्व शेर असू शकतात.

मात्र गझलेतून कोणताही शेर बाहेर वेगळा काढून त्याचे चिंतन केले, तर मागचा पुढचा कोणताही संदर्भ नसूनही तो शेर म्हणजे एक संपूर्ण अभिव्यक्ती, एक वेगळी कविताच असल्याचे आढळून येते. **गझलेच्या फॉर्ममध्ये उलगडत जाणारी सलग कविता लिहिली जाऊ शकते; पण ती कविताच, गझल नव्हे !** उर्दूत अशा कितीतरी कविता आहेत. गझलेचे खरे गमक हेच आहे की, सुटा शेरही एक पूर्ण कविताच असतो.

म्हणजे नेहमीची कविता आणि गझल ह्यात—

**(१) अनेक कवितांची एकाच फॉर्ममध्ये किंवा आकृतिबंधात बांधणी व मांडणी आणि (२) प्रत्येक शेराचे कविता म्हणून स्वतःचे सार्वभौमत्व.**

हे दोन महत्त्वाचे व मूलभूत फरक असतात.

रसिकांनी प्रत्येक शेराचा स्वतंत्र आनंद घ्यायचा असतो, प्रत्येक शेराची वेगळी चव स्वतंत्रपणे घ्यायची असते. आणि प्रत्येक शेराचे स्वतंत्र रसग्रहण व चिंतन करायचे असते. गझल लिहिणाऱ्याची हीच अपेक्षा असते.

"एकाच गझलेतून विविध विषय हाताळले जाऊ शकतात. त्यामुळे सलगता राहत नाही, प्रवाह खंडित होतो आणि रसभंग होतो" असा एक आक्षेप घेतला जातो.

ह्या विषयी आदरणीय श्री. सेतुमाधवरावजी पगडी म्हणतात—"याला उत्तर हेच की, गझलमधील प्रत्येक शेर स्वतंत्र समजून त्याचे रसग्रहण करावे. मुशाइऱ्यांतून अशा प्रकारे रसग्रहण केले जाते. एक कल्पना एकाच शेरमधून मांडण्याचे आणि ती यशस्वीपणे मांडण्याचे कौशल्य हे उर्दूत उत्तम काव्याचे गमक आहे. टला ट जोडून शेर रचणारे कवि असंख्य आहेत. उर्दूत तर त्यांचे पेवच फुटले आहे. पण अर्थपूर्ण, प्रभावी आणि परिणामकारक रचना आणि तीही दोन ओळीत करणे अत्यंत अवघड आहे." (उर्दू काव्याचा परिचय : पान २८०).
—आणि हे अत्यंत अवघड आहे. म्हणूनच यशस्वी म्हणजेच अर्थपूर्ण, प्रभावी, परिणामकारक व ताकदीचे शेर असलेली गझल **एक कायदा म्हणूनच** कविसंमेलनात आणि छापील स्वरूपातही हटकन बाजी मारून जाते.

हे असे आहे म्हणूनच आज गझलेवर काही गोटांतून "सौंदर्यशास्त्रीय" आक्षेप घेतले जात आहेत, हे युगसत्य मराठी रसिकांनी, गझल लिहिणाऱ्यांनी आणि मी ज्यांच्यासाठी गझल लिहीत आहे; त्या स्वच्छ मनाच्या आजच्या व उद्याच्या तरुण पिढीने लक्षात घेतले पाहिजे.

आता आपण गझलेच्या आकृतिबंधाविषयी विचार करू या.

गझलेच्या पहिल्या शेराला "मतला" म्हणतात. प्रत्येक शेरात दोन ओळी असतातच. पण मतल्याच्या शेरात दोन्ही ओळीत यमक (काफिया) आणि अन्त्ययमक (रदीफ) असते. उदाहरणार्थ—

राहिले रे अजून **श्वास किती**
जीवना ही तुझी **मिजास किती**

ह्या माझ्याच एका गझलेतील मतल्याच्या ह्या शेरात **दोन्ही ओळीत**

"श्वास" आणि "मिजास" अशी यमके आहेत. आणि "किती" हे अन्त्य-यमक उर्फ रदीफ आहे. आणि एकच मात्रावृत्त आहे.

गझलेच्या पहिल्या शेरात म्हणजेच मतल्यात दोन्ही ओळीत यमक व अन्त्य-यमक आलेले आहे. पण मतल्यानंतर येणाऱ्या प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीत यमक आणि अन्त्ययमक येत असते. उदाहरणार्थ—

सोबतीला जरी तुझी छाया
मी करू पांगळा **प्रवास किती ?**

मासला म्हणून आपण माझा एक मतला आणि त्यानंतरचा शेर पाहिला. ह्या दोन्ही शेरात श्वास, मिजास आणि प्रवास अशी यमके आलेली आहेत. आता ह्याच गझलेतील अजून एक शेर पाहू—

हे कसे प्रेम ? या कशा आशा ?
मी जपावे अजून **भास किती** ?

म्हणजे येथे दुसऱ्या ओळीत "भास" हे यमक आणि "किती" हे अन्त्ययमक आलेले आहे. मतल्यानंतर येणाऱ्या प्रत्येक शेराच्या फक्त दुसऱ्या ओळीत यमक आणि अन्त्ययमक येत असते.

परंतु काही गझलांत अन्त्ययमक म्हणजेच रदीफ नसते. अशा गझलांना "गैर-मुरद्दफ" म्हणतात. आता माझ्याच एका गैर-मुरद्दफ गझलेचे काही शेर नमुन्यादाखल देतो—

दिवसात चोरट्यांनो जाळू नका **मशाली**
अजुनी न सूर्य केला तुमच्या कुणी **हवाली**
माझे जगावयाचे अप्रूप एवढे की,
जमले मला बघाया मुडदेच **भोवताली** !
उरली विरंगुळ्याला ही सांजवेळ माझी
उरल्या तुझ्या जराशा प्राणात **हालचाली**

येथे मतल्याच्या पहिल्या शेरात "मशाली" आणि "हवाली" ही दोन यमके दोन्ही ओळीत आहेत. नंतरच्या शेरात फक्त दुसऱ्या ओळीत "भोवताली" आणि तिसऱ्या शेराच्या दुसऱ्या ओळीत "हालचाली" ही यमके आहेत. मात्र यमक आल्यानंतर अन्त्ययमक म्हणून कोणताही शब्द नाही.

शेरातील प्रत्येक ओळीला "मिसरा" म्हणतात. पहिल्या ओळीला "ऊला मिसरा" म्हणतात. तर दुसऱ्या ओळीला "सानी मिसरा" म्हणतात.

**शेरात जे सांगायचे असते त्याची प्रस्तावना म्हणजे पहिली ओळ असते, तर दुसरी ओळ म्हणजे पहिल्या ओळीतील प्रस्तावनेचा उत्कट व प्रभावी**

**समारोप असतो. म्हणून शेर लिहितांना दुसरी ओळ लिहिणे, हे अधिक जबाबदारीचे व अधिक अवघड काम असते.** नुसते यमक, अन्त्ययमक आणि वृत्त साधून दुसरी ओळ जमत नसते, तर ती ओळ जे सांगायचे आहे त्याचा शेवट असल्यामुळे, तेवढ्याच ताकदीने पण सहज आली पाहिजे.

हे सर्व घडले तरच शेर "कामयाब" होतो !

गझलेच्या शेवटच्या, कवीचे टोपण नाव असलेल्या शेवटच्या शेराला "मकता" असे म्हणतात. हा मकता गझल कुणाची हे रसिकांना सांगत असे. पण आता मकत्याची गरज राहिलेली नाही.

पूर्वीच्या काळी छापखाने, नियतकालिके आणि वर्तमानपत्रे अस्तित्वात नव्हती. त्या काळात गझल कुणाची हे कळण्यासाठी शेवटच्या शेरात म्हणजेच मकत्यात "तखल्लुस" म्हणजेच कवीचे टोपणनाव नमूद केले जाई. सर्वच काम हाताने करावे लागे. पण आज हजारो आणि लाखोंच्या संख्येत पुस्तके आणि वर्तमानपत्रे छापली जात असताना तखल्लुसरूपी विमा उतरवण्याची गरज राहिलेली नाही. मी स्वतः तखल्लुस वापरत नाही. आणि शेवटच्या शेरात तखल्लुस घालून एका अन्य उपयुक्त शब्दासाठी लागणारी जागा वाया घालवू नये, असे माझे मत आहे.

गझलेच्या शेरात, फक्त दोन ओळीत, **कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त सांगण्यासाठी प्रतीकात्मक शब्दांचा उपयोग** केला जातो. उदाहरणार्थ आजच्या परिस्थितीचे वर्णन करताना **एक मुसलमान म्हणून** कवी आपल्या शेरात चमन (उद्यान), बहार (वसंत), जा (स्थान) आणि आशियाँ (घरटे) अशा प्रतीकात्मक शब्दांचा कसा उपयोग करतो ते पहा—

**हमारे फूल, हमारा चमन, हमारी बहार।**
**हमीं को जा नहीं मिलती है आशियाँ के लिए !**

--फुले आमची आहेत. उद्यान आमचे आहे. वसंत (स्वातंत्र्य) आमचा आहे. (पण) आम्हालाच ह्या उद्यानात (म्हणजे देशात) घरट्यासाठी जागा मिळत नाही.

जे गाऱ्हाणे मांडण्यासाठी इतरांना पानेच्या पान खरडावी लागली असती, ते गाऱ्हाणे फक्त चार प्रतीकात्मक शब्दांचा उपयोग करून कवीने केवळ दोन ओळींच्या एका शेरात प्रभावी रीतीने मांडले आहे. पण व्यापक दृष्टीने विचार केला तर हे गाऱ्हाणे भारताच्या साऱ्या सामान्य नागरिकांचेही असू शकते. म्हटले तर मुसलमान समाजाचे गाऱ्हाणे आणि म्हटले तर साऱ्या भारतीय जनतेचे गाऱ्हाणे !

गझलच्या बाबतीत भारतीय उर्दू कवींचे शिरोमणी कै. रघुपती सहाय "फिराक" गोरखपुरी आपल्या "उर्दू भाषा और साहित्य" या ग्रंथात पृष्ठ

क्रमांक ३५१ वर म्हणतात, " ग़ज़ल के शेरों के विषय सीमित नहीं हैं, फिर भी उस में मुख्यतः करुणा, प्रेम व समर्पण के ही भाव प्रदर्शित किए जाते हैं. **ग़ज़लों में चूँकि एकही शेर में पूरी बात कह देनी होती है, इसलिए उन में प्रतीकात्मता का बहुत सहारा लिया जाता है और चूँकि एक-एक शब्द विभिन्न परिस्थितियों में असंख्य वस्तुओं का प्रतीक हो सकता है, इसलिए धीरे-धीरे ग़ज़ल में व्यापकता की कला इतनी विकसित हो गई है कि एक ही शेर प्रतीक रूप में आध्यात्मिक, सामाजिक, राजनीतिक और व्यावहारिक जीवन को एक-सा लागू हो सकता है.** इसी आधार पर दार्शनिक (phylosophical) तथ्यों को कविता के साथ सामने लाने में ग़ज़ल का प्रयोग बहुत किया जाता है. इसलिए ग़ज़ल की परंपरा गम्भीरता और तत्वज्ञान की परम्परा बन गई है, यद्यपि उपरी दृष्टी से देखने पर उस में आशिक-माशूक के चोंचलों के अलावा कुछ नहीं दिखाई देता. यही ग़ज़ल की तारीफ़ है."

गझलेमध्ये मुख्य भाव करुणा, प्रेम व समर्पण हे आहेत, असे फिराकसाहेब म्हणतात. पण त्यांनी " भाव " शब्द वापरलेला आहे, " विषय " नव्हे. पण आता काळाप्रमाणे गझलही विकसित झालेली असल्यामुळे ती वरील " भाव " सोडून इतरही विषय हाताळू लागलेली आहे.

पुढे कै. रघुपती सहाय " फिराक " गोरखपुरी म्हणतात, " पुराने ज़माने में ग़ज़ल का एक और रूप प्रचलित था, जिसे 'ग़ज़ले-मुसलसल्' कहते हैं. इस में शेर अलग-अलग स्वतंत्र विषयों पर नहीं होते बल्कि एकही विषय पर कहे हुए होते हैं बल्कि उन में परस्पर सम्बंध भी होता है. **वर्तमान समय में नज़्मों (कविता) के कारण इस प्रकार की ग़ज़ल की जरूरत ही नहीं रही.**"

ह्याचा अर्थ असा की, सध्या उर्दूत **नेहमीची कविता** एकाच विषयाला हात घालते आणि उर्दू गझलेमध्ये विविध विषय हाताळले जातात. गझलेच्या फॉर्म-मध्ये एकाच विषयावर लिहिलेल्या रचना आज उर्दूत " नज़्म " (कविता) म्हणूनच ओळखल्या जातात. कारण त्यात फॉर्म कवितेचा असला तरी एकच विषय प्रत्येक शेरापाठोपाठ उलगडत जातो.

फिराकसाहेबांनी प्रतीकात्मक शब्दांविषयी जे म्हटलेले आहे, तेही मराठी रसिकांनी आणि गझल लिहू पाहणाऱ्या तरुण पिढीने लक्षात घेतले पाहिजे. फक्त दोनच ओळींच्या एकाच शेरात एक संपूर्ण विश्व सामावून घ्यायचे असल्यामुळे शब्दांच्या खोगीरभरतीला शेरात कुठे वावच नसतो. There is no room for the wastage of words in a couplet.

—म्हणूनच प्रतीकात्मक शब्द वापरले जातात. आणि ह्या प्रतीकात्मक शब्दांचा परिणाम म्हणून एकाच शेराचे अनेक अर्थ लागतात आणि हीच तर शेराची खरी गंमत आहे !

फारसीकडून गझल घेत असताना उर्दू कवींनी फारसी काव्यातील प्रतीकात्मक शब्द जसेच्या तसे उचलले. पण अलिकडच्या काळात उर्दू गझलेत फारसी काव्यातील प्रतीके कमीकमी उपयोगात आणली जात आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे.

**मराठी गझलेने उर्दू काव्यातील प्रतीकात्मक शब्द जसेच्या तसे स्वीकारण्याची मुळीच गरज नाही.** महाराष्ट्र आणि मराठी भाषा व मराठी संस्कृतीची प्रदीर्घ समृद्ध परंपरा आपल्याला मराठी गझलेसाठी हवे तेवढे प्रभावी प्रतीकात्मक शब्द देऊ शकते. आपल्या महाराष्ट्रात आपल्या भोवतीच्या जीवनातून मराठी गझलेसाठी भरपूर प्रतीकात्मक शब्द मिळू शकतात. उदाहरणार्थ—

**ताठ कॉलरींचा ताठा वाकणार आहे**
**वंचनाच ज्याची त्याला गाडणार आहे**
**गटारात खुपसुन माना सूर्य शोधती जे**
**गगन का तयांचे मिंधे राहणार आहे ?**
**मठोमठी मंबाजींना कीर्तने करू द्या**
**विठू काय बेमानांना पावणार आहे ?**

आता—"ताठ कॉलरी, गटार, सूर्य, गगन, मठ, मंबाजी आणि विठू" हे शब्द प्रतीकात्मकच नाहीत काय ? जे सांगण्यासाठी एरवी ५०–६० ओळी खर्ची पडल्या असत्या, ते सारे **फक्त दोन ओळीत** कोणत्याही पाल्हाळाशिवाय सांगण्यासाठी हा मंबाजी आणि हा विठू मदत करतो, हे आजच्या बेमानांनी कळूनसुद्धा मान्य केलेले नसले तरी महाराष्ट्रातील सामान्य मराठी माणसांना ह्या शेरांचा अर्थ क्षणार्धात कळतो आणि पटतो. पण "कळणे आणि पटणे हे हलक्या कुळाचे लक्षण आहे," असा एक सोयीस्कर गैरसमज आपल्या वर्गीय अहंकाराच्या वाळूत मान खुपसून बसलेल्या काही अभिजात शहामृगांनी करून घेतलेला आहे. वादळ आले की शहामृग असेच करतात !

प्रतीकात्मक शब्द वापरले म्हणून गझलवर तोचतोपणाचा किंवा उथळपणाचा आरोप करणारे स्वतः गझल लिहीत नसतात. फार तर ते जे काही लिहितात, त्यालाच ते "गझल" असे शीर्षक देतात. आणि **आपण जर बारकाईने काळजीपूर्वक आजचे "मुक्त" काव्य तपासले, तर ह्या काव्यात हजारो प्रतीकात्मक शब्द विखुरलेले आढळून येतील.** हे प्रतीकात्मक शब्द पुष्कळदा इंग्रजी भाषेतीलही असतात. उदाहरणार्थ–१९८३ च्या "मौज" वार्षिकात कविवर्य प्रा. वसंत सावंत ह्यांच्या "पक्षी" ह्या कवितेतील काही ओळी अशा—

"एक सैबेरियन पक्षी गात गात येतो एखाद्या सायंकाळी....मी पाहतो एक आफ्रिकन पक्ष्यांचा थवाही....त्यांच्या पंखांत असावी वीज आणि डोक्यात इलेक्ट्रॉन्स बसवलेले....गळ्यात ट्रान्झिस्टर असतात अनोख्या गाण्यांचे"

प्रतीके म्हणून येथे "सैबेरियन, आफ्रिकन, इलेक्ट्रॉन्स आणि ट्रान्झिस्टर" हे शब्द आलेले नाहीत काय ?

ह्याच अंकात कविवर्य ग्रेस ह्यांच्या "कृष्णएकांत" या कवितेत आलेले प्रतीकात्मक शब्द पहा.

तिच्या अंगणातील **प्राजक्त बंदी** तरी **सत्यभामे** ढळे तोल का ?
झाडाप्रमाणे असे झाड हेही असे सांगते ती, तरी हुंदका ?
इथे **बासरीच्या** गडे आतड्याला हवा चंदनी लाकडाची नवी;
तुला **रुक्मिणी** का फुले वेचतांना सुगंधातही भेटते **वाळवी ?**
संहार आता करा **यादवांचा** जुनी **राजधानी** निनावी करा;
रथाला कुणी अश्व देऊ नका अन् शिरच्छेद माझे कसेही धरा.
वैराण आयुष्य झाले तरीही **फुलांना** कधी बोल देऊ नये;
मी बांधिलेल्या उन्हाळी घरांच्या गवाक्षातला **चंद्र** झाकू नये.
नको धाक घालू नको हाक तोलू इलाख्यातली गुप्त झाली नदी;
निजेच्या भयाने जसा शुभ्र होतो खुनाच्या कटातूनही **गारदी....**

ह्या कवितेत "प्राजक्त, सत्यभामा, बासरी, रुक्मिणी, वाळवी, यादव, राजधानी, फुले, चंद्र, गारदी" इत्यादि शब्द प्रतीके म्हणूनच कविवर्य ग्रेस ह्यांनी योजिली नाहीत काय ?

फरक एवढाच आहे की, एक विषय (Theme) उलगडण्यासाठी कविवर्य ग्रेस ह्यांनी सहा कडवी (एक कडवे मी गाळले आहे) लिहिली आणि त्या कडव्यात वरील प्रतीकात्मक शब्दांचा उपयोग केला, तर गझलेत मात्र फक्त दोन ओळींचा एक शेर एक Theme हाताळतो आणि ती थीम अगदी सहज रसिकांच्या हृदयात पोचविण्यासाठी **कवितेप्रमाणेच प्रतीकात्मक शब्दांचा उपयोग करतो.** म्हणून दोन ओळींचा एक ताकदीचा शेर वृत्त, यमक, अन्त्ययमक आणि सहजता साधून लिहिणे हे अधिक अवघड आहे.

मराठी गझल मराठी मानसिकतेला सुपरिचित असलेली प्रतीके सोबतीला घेऊनच पुढे जाणार आहे. मात्र त्याच वेळी आम्हाला ओळखीची असलेली इतर भाषांतील प्रतीके उपयोगात आणण्यास मुळीच हरकत नाही.

जर सैबेरिया, आफ्रिका, इलेक्ट्रॉन्स आणि ट्रान्झिस्टरचा स्वीकार होऊ शकतो तर मग आम्ही आमच्या जुन्या ओळखीच्या मद्यशाळेचा, साकीचा, पेल्याचा व मद्याचा विटाळ का मानावा ? मराठी माणसांना सहज उमगणारी अ-मराठी प्रतीके मराठी गझलेने पचवली पाहिजेत, असे माझे स्वतःचे मत आहे.

येथे कुणाचाही पाणउतारा करण्याची माझी इच्छा नाही. आपापल्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या वडिलधाऱ्यांची किंवा समकालिनांची टर उडवून मला गझलचा झेंडा उभारायचा नाही. पण गझलेविषयी कोणतीही माहिती नसताना, किंवा मतला, मकता, काफिया, रदीफ, शेर, मिसरा, ऊला, सानी इत्यादि काही ठराविक पारिभाषिक शब्दांपुरतीच जुजबी माहिती असूनही गझलविषयी अनुदार भाष्ये करणारे काही कवी आणि तथाकथित समीक्षक महाराष्ट्रात आहेत.

**गझल ही शेवटपर्यंत एकाच वृत्तात लिहायची असते आणि गझल हे वृत्त नाही, हे अद्यापही अनेकांना समजलेले नाही.** अभंग किंवा ओवीसारखी अक्षर-वृत्ते सोडल्यास **कोणत्याही वृत्तात गझल लिहिता येते.**

मी मराठी गझलेसाठी माझ्या अर्ध्याहून अधिक आयुष्याची किंमत मोजल्या-नंतर मला नियतीने सवाल केला, **"एकीकडे विविधरंगी तथाकथित थोरांचे कडेकोट अभिजात हितसंबंध आणि दुसरीकडे महाराष्ट्राची संपूर्ण तरुण पिढी, ह्यांत अधिक महत्त्वाचे कोण ?"**

मी माझा कौल तरुण पिढीच्या बाजूने दिलेला आहे आणि म्हणून गझलेचे जे निर्भेळ सत्य आहे, ते आणि फक्त तेच कोणाचीही पर्वा न करता येथे सांगणे हे माझे कर्तव्य आहे. भारतात प्रत्येकच माणूस शतायुषी नसतो. आणि आता जे आयुष्य उरले आहे, त्याचे सार्थक व्हावे अशी माझी इच्छा आहे. उगवत्या पिढीने गझलेला आपले म्हटले की, मला हे सार्थक मिळणार आहे. माझे तरुण पिढीला एवढेच सांगणे आहे की,

**हम से जो हो सका सो कर गुजरे**
**अब तेरा इम्तेहान है प्यारे !**

ज्यांना गझल लिहिणे जमत नाही, ज्यांना आपले अज्ञान लपवून ठेवायचे आहे, ज्यांना आपापल्या हितसंबंधांची राखण करायची आहे; त्यांचा असा पेटंट आरोप आहे की, वृत्त आणि यमकाचे बंधन पडल्यामुळे गझल कृत्रिम व अनैसर्गिक आहे. **ह्या आरोपाचा अर्थ असा होतो काय की, टी. एस्. इलियट जन्मण्यापूर्वी भारतात जे काही लिहिले गेले, ते सारेच्या सारे कृत्रिम व अनैसर्गिक होते ?** ह्यावर असेही तर्कदुष्ट उत्तर देता येईल की, आता जागतिक पातळीवर वृत्तबद्ध काव्य कालबाह्य झालेले आहे.

**पण जोपर्यंत मानवजात ह्या पृथ्वीतलावर शिल्लक आहे, तोपर्यंत लय, ताल आणि सूर शिल्लक राहतील आणि म्हणून वृत्तबद्ध आणि गेय काव्य कधीही कालबाह्य होणार नाही. आणि जे काव्य मूलभूत मानवी मूल्यांशी इमान राखते, जे मानवाच्या सुखदु:खांविषयी, त्याच्या स्वप्नांविषयी, त्याला**

**हव्या असलेल्या न्यायासाठी उत्कटपणे व परिणामकारकपणे बोलते; ते काव्य कधीही कालबाह्य होत नाही.**

मी निरीश्वरवादी आहे. मी स्थितिवादी नाही. "ठेविले अनंते तैसेचि राहावे!" हा उपदेश मला मान्य नाही. नसलेल्या परमेश्वरावर हवाला ठेवून स्वस्थ सोसत बसणे मला मान्य नाही. दुर्दैवाने संतजनांनी हेच केले. परंतु त्याच वेळी त्यांच्या काव्यात मानवाचे दुःख बोलते, करुणा बोलते आणि सामाजिक दंभ व पाखंडाविरुद्ध त्यांची चीड आग ओकते. म्हणूनच ज्ञानेश्वर, एकनाथ, चोखोबा व तुकारामांसारख्या संतांच्या ओव्या आणि अभंगवाणी आजही कालबाह्य नाही. आजही महाराष्ट्राच्या ओठांवर ज्ञानेश्वराची ओवी, एकनाथांचे भारूड आणि तुकारामांचे अभंग आहेत.

खरे तर आपल्या सोयीनुसार वृत्तबद्ध आणि गेय काव्याला कालबाह्य ठरवू पाहणारेच वर्तमानकाळात कालबाह्य आहेत! वर्तमानकाळाचा हात धरून भविष्यकाळाची वाटचाल करणारा कवी कधीही कालबाह्य होत नसतो. **काळाचा संदर्भ बदलला तरी हृदयाला स्पर्श करणाऱ्या शब्दांत सामावलेल्या चिरंतन तत्त्वांचा कस उतरत नसतो.** आणि मुळातच कस नसला तर तथाकथित आधुनिक काव्याची पुस्तके कवी जिवंत असतानाच वाचनालयांच्या कपाटांत धूळ खात पडतात—आपुले मरण पाहिले म्यां डोळा!

माझे स्वतःचे असे मत आहे की, मुक्त लिहा किंवा वृत्त व यमकांचे बंधन पाळून लिहा; **पण तुम्ही जे लिहाल ते आधी उत्कृष्ट काव्य असले पाहिजे.** माझे असेही मत आहे की, जे ऐकल्यानंतर किंवा वाचल्यानंतर आठवत नाही, रक्तात भिनत नाही, काळजाचा ठाव घेत नाही, मनात रेंगाळत नाही, ते काव्यच नव्हे! मग प्रकार कोणताही असो!

**गझल हे फक्त "श्राव्यकाव्य" आहे असे म्हणणे साफ चुकीचे आहे. तसे असते तर भारतीय उपखंडात मोठमोठ्या कवींच्या गझलांचे "दीवान" घेऊन लक्षावधी लोक रात्रीच्या रात्री जाळून काढून वाचत बसले नसते.** गझल आणि तीमधील शेर नुसते कानावर पडण्यासाठी नसतात, त्यांचे चिंतन होत असते! ती नशा आजन्म चढलेली असते. एकेक शेर (मैफल किंवा मुशाइरा सुरू नसूनही) आपणास जीवनाच्या क्षणोक्षणी एकेक प्रत्यय देत असतो. गझल म्हणजे एक तत्त्वज्ञानच आहे. आणि ती एक जीवनशैलीही आहे. जेव्हा आपण जीवनाच्या विविध चवी घेत असतो तेव्हा आपण गझलच जगत असतो. **एकेक शेर म्हणजे जगण्याची एकेक चव, एकेक प्रत्यय!**

गझल हे फक्त श्राव्यकाव्य आहे, ह्या अन्यायकारक विधानाचे खंडन करण्यासाठी माझा हा "एल्गार" पुरेसा आहे. जे आपल्याला माहीत नाही, जे

आपल्याला जमत नाही किंवा ज्यामुळे आपल्यात भयगंड निर्माण होतो ते सर्व हिणकस व त्याज्य ठरविण्याची प्रवृत्ती मानसशास्त्राला अपरिचित नाही.

गझलेवर विविध आक्षेप घेतले जातात. ह्या बाबतीत मी एवढेच सांगतो की, **दोष संबंधित काव्यप्रकाराचा नसतो, तर लिहिणाऱ्याचा असतो ! आज गझलेवर जे आक्षेप घेतले जातात, तेच आक्षेप बहुसंख्य मराठी कवितांवरही घेतले जाऊ शकत नाहीत काय ? चांगले लिहिणे हीच खरी जबाबदारी असते.**

गझलेविषयी एक महत्त्वाची गोष्ट सांगतो. नुसत्या रचनाकौशल्यानेच यशस्वी गझल लिहिता येत नसते. गझलेचे नुसते तंत्र समजले [आणि ते वृत्त (बहर), यमक (काफिया) आणि अन्त्ययमक (रदीफ) इत्यादी मंडळींची मर्जी राखून] तंतोतंत अमलात आणले आणि तरीही अखेर प्रभावीपणे काहीही सांगता आले नाही, तर तो शेर अक्षरशः कोसळतो. अशा शेराला "शेर बराए शेर" म्हणतात. ह्याचा अर्थ शेरासाठी शेर ! अशा शेराला अजूनही एक पदवी आहे- भरती का शेर !

**शेरात जे सांगायचे असते ते आधी सर्वात महत्त्वाचे असते. आणि तेही पर्यायी शब्द सापडणार नाहीत इतक्या कमीतकमी शब्दात सांगायचे असते.**

जशी मुंबईच्या बिऱ्हाडात उपऱ्या पाहुण्यांसाठी जागाच नसते, तशीच शेरात आगंतुक शब्दांसाठी जागाच नसते. ज्या शेरात गरज नसताना आणि फक्त मात्रापूर्तीसाठी विशेषणांचा, क्रियाविशेषणांचा आणि ही, च, अन् इत्यादि बाजारबुणग्यांचा समावेश होतो; **तो शेर म्हातारीच्या लाजण्यामुरडण्यासारखा निष्प्रभ ठरतो.** अनावश्यक शब्दांनी घडवलेला पोचट शेर कवीला Expose करतो.

नेहमीच्या कवितेत कवीचा हा शब्दखोर लबाडपणा सहजी लक्षात येत नाही. पण फक्त दोन ओळींच्या शेरात कवी आपला खोटेपणा व कमकुवतपणा लपवूच शकत नाही.

म्हणूनच काव्यक्षेत्रातील सूज्ञ व अनुभवी "सज्जन" सहसा गझलेच्या वाटेला जात नाहीत. ज्याप्रमाणे अनेक अप्रामाणिक लोक श्रम करण्याऐवजी नाना लटपटी करून झटपट श्रीमंत होण्याच्या खटपटीत असतात, त्याचप्रमाणे गझलेलाच कशाला; एकूणच वृत्तबद्ध कवितेलाच नावे ठेवत ठेवत तथाकथित "मुक्त" काव्यलेखनाचा शॉर्टकट घेऊन आपली "करिअर" बनवू पाहणारे तथाकथित कवी शेकडो आहेत. वास्तविक गझल हाही एक मुक्तछंदातील कवितेसारखाच एक काव्यप्रकार आहे. पण हे मान्य करणे संबंधितांच्या सोयीगरसोयीवर अवलंबून असते.

आणि मी असेही पाहत आहे की, काही काळापूर्वी एकूणच वृत्तबद्ध कवितेची "अ-कविता" म्हणून संभावना करणारे, वृत्तबद्ध काव्य लिहिणाऱ्यांना

"गीतकार" म्हणून हेटाळणारे अनेक अत्याधुनिक कवी आज उत्साहाने "गझल" लिहू लागले आहेत. अनेक बुजुर्गसुद्धा साधा काफिया आणि रदीफ चालवता येत नसूनही ते जे काही लिहीत आहेत, त्याला "गझल" हे नाव देत आहेत. सर्वांत उद्वेगजनक गोष्ट अशी की, त्यांची मुळापासून जाणून घेण्याची साधी इच्छाही नाही. **एकदा नावलौकिक मिळाल्यावर काबाडकष्टांची गरजच काय ?** पण त्यांचे हे बनचुकेपणही फार काळ त्यांच्या उपयोगी पडणार नाही.

खरे सांगू का ? **गझलेवर आक्षेप घेणाऱ्यांचा खरा आक्षेप गझलेवर नसून त्यांच्या टोळीचे सभासद नसलेल्या इतरांच्या अस्तित्वावरच आहे.** आणि हे अस्तित्व नाकारण्यासाठी काव्य सोडून इतरही वैयक्तिक संदर्भांचा खराखोटा कसाही सढळ उपयोग केला जातो. गेली २७ वर्षे गझल लिहीत असताना माझ्या पदरात पडलेले हे जळजळीत जीवनसत्य महाराष्ट्राच्या उगवत्या पिढीसमोर ठेवून मी आज मराठी गझलेसाठी न्याय मागत आहे.

**आपापल्या सुखाशी केला करार त्यांनी**
**मी बोचताच माझी केली शिकार त्यांनी**

मी येथे पुन्हा सांगतो की, माझा कोणत्याही काव्यप्रकारास आक्षेप नाही. **खरा प्रश्न तो काव्यप्रकार समर्थपणे राबवण्याचा असतो.** ज्याने त्याने आपापल्या मार्गाने जावे. पण "गझलेचे कवितेवर आक्रमण होत आहे." असा हेतुपूर्ण चामडीबचाऊ कांगावा काळ ऐकून घेणार नाही. **अभिव्यक्तीच्या लाटांना विविध नावे दिली तरी शेवटी ह्या सर्व लाटांचा जन्मदाता काव्यसागरच असतो.** गझलेवर कवितेवरील आक्रमणाचा आरोप करणाऱ्यांचा पवित्रा असा आहे की, गझल हा वृत्त आणि यमकाला मानणारा गेय प्रकार असल्यामुळे तो "काव्य" नाही आणि आम्ही लिहितो तेच काव्य; मग ते लोकांना समजो वा न समजो, आवडो वा न आवडो.

गझलेवर असा 'अ-कविता' असण्याचा आक्रमणवादी आरोप करणाऱ्यांचे स्वतःच्या "कविते"विषयी म्हणणे असे — "ज्यांना आमची 'कविता' समजून घ्यायची असेल ते समजून घेतील, ज्यांना समजते ते समजतील, आम्ही लिहिणार ! तुम्हाला समजून घ्यायचे असेल तर समजून घ्या. आमचे लिहिणे गझलेसारखे Cheap नसते. आमचे काव्य रसिकरंजक नाही. (येथे 'रंजक' हा शब्द महत्त्वाचा.) म्हणूनच ते सर्वसामान्य मूर्ख व मठ्ठ मराठी माणसांना समजत नाही. आमच्यासारखे मोजके Elite च आज मराठी कवितेला जगवत आहेत. बाकीचे सर्व शूद्र आहेत. आम्ही साहित्य-क्षेत्रातील 'ब्रह्मकुलोत्पन्न' आहोत. बाकीचे 'नीचकुलोत्पन्न' आहेत. आम्ही बहुसंख्य मराठी मूर्खांसाठी लिहितच नाही. आम्हाला लोकांची पर्वा नाही. कारण

आम्ही Popularity च्या मागे धावत नाही. (आणि आम्हाला Popularity नको असल्यामुळेच आम्ही विविध नियतकालिकांकडे आमच्या कविता न विसरता नम्र निष्ठेने **नियमित** पाठवत असतो.) अर्थात, आम्हाला Popularity नको असल्यामुळे आणि मराठी माणसे मूर्ख असल्यामुळे आमच्या प्रसिद्ध होणाऱ्या कविता कुणी वाचाव्यात असा आमचा आग्रह नाही. तरीपण गझलेचे कवितेवर आक्रमण होत आहे बरे! आणि आम्ही आकाशवाणी आणि दूरदर्शन ही माध्यमे लोकांना आमच्या कविता समजाव्या म्हणून वापरत नाही. आम्ही महाराष्ट्रावर अभिजात काव्याचा उपकार करण्यासाठी ही माध्यमे वापरतो."

कविता ही वास्तविक संवाद (Comunication) साधण्यासाठी असते. आणि सामान्य लोकांच्या सहभागाशिवाय कविता जगूच शकत नाहीत. प्राचार्य राम शेवाळकर ह्यांचे शब्द मला आठवत आहेत—**प्रत्येक कवी हा बोलका रसिक असतो आणि प्रत्येक रसिक हा मुका कवीच असतो.**

बहुसंख्य माणसे मुर्दाड नसल्यामुळे, त्यांच्या संवेदना मेलेल्या नसल्यामुळे रसिकच असतात. शेलक्या लोकांसाठीच आम्ही लिहितो, आमची कविता आम पब्लिकसाठी नाही, अशी सोळभोग भूमिका घेणारे "अभिजात" जीव आपापली जाहीर कौतुके करवून घेण्यास नकार का बरे देत नाहीत? माझे म्हणणे असे की, जी कविता सामान्य माणसाच्या हृदयात जागा मिळवू शकत नाही, ती फार तर म्युझियममध्ये ठेवता येईल. कवी आणि कविता बहुसंख्य सहृदय लोकांशिवाय शिल्लकच राहू शकत नाहीत.

हे लिहीत असतांना मला स्वर्गीय पंडित बालमुकुंद "अर्श" मलसियानी ह्यांच्या काव्यपंक्ती आठवत आहेत—

**पूछ अगले बरस में क्या होगा**
**मुझ से पिछले बरस की बात न कर**
**यह बता हाल क्या है लाखों का**
**मुझ से दो-चार-दस की बात न कर**

मला स्वतःला कोणत्याही काव्यप्रकाराचे वावडे नाही. पण **आपापल्या हिशेबी हितसंबंधानुसार गझलेचा धोरणी उपहास करणाऱ्यांचा जमाना आता संपलेला आहे, हे त्यांनी लक्षात ठेवावे.**

स्वतःपुरते सांगायचे तर जीवनाच्या अंधारातही मी गझलेचा हात सोडला नाही, सोडणार नाही. कारण मला अंधारात सापडलेली गझल उद्या सूर्य म्हणून उगवणार आहे. आणि महाराष्ट्राच्या उगवत्या पिढ्या ह्या सूर्याच्या प्रकाशात वाटचाल करणार आहेत.

हे सर्व वाचून माझ्यावर अहंकाराचा आरोप होण्याची शक्यता मी नाकारत नाही. पण विटाळ गेलेल्या पिढीची मला पर्वा नाही.

**जमणारच नव्हते माझे ह्या माझ्या चोरपिढीशी**
**मी येणाऱ्या काळाची अनमोल अनामत होतो !**

" एल्गार "साठी कुणाची प्रस्तावना घ्यायची ? असा मी सारखा विचार करत होतो. काही नावांचा मी विचारही केला. पण शेवटी मला असे आढळून आले की, मीच फक्त मीच हा " एल्गार " सुरू होण्यापूर्वी लिहिले पाहिजे. आणि जर मी लिहिले नाही तर तो रसिकांवर आणि माझ्यावरही अन्याय होईल. म्हणून एवढे लिहून मोकळा झालो. मी हे जे लिहिले आहे, त्याला कुणी प्रस्तावना समजू नये. प्रस्तावना लिहिण्याइतका मी विद्वान नाही. तेवढा विद्वान असतो तर मग मी कवी कशाला झालो असतो ? ही फक्त गझलेची आणि माझी कैफियत आहे.

जसे जमले तसे आणि जे उचंबळून आले ते मी येथे लिहिले. मी जे लिहिले ते सुसंबद्ध, पद्धतशीर आणि केवळ टीकाशास्त्रीय लिहिले, असा माझा दावा नाही. मी हे उद्यासाठी लिहिले आहे—

**जरी ह्या वर्तमानाला कळेना आमुची भाषा**
**विजा घेऊन येणाऱ्या पिढ्यांशी बोलतो आम्ही**

माझ्या ह्या " एल्गार " काव्यसंग्रहाच्या भवितव्याविषयी मला जरासुद्धा काळजी नाही. कारण कवी ज्या भाषेत लिहितो ती भाषा बोलणारी बहुसंख्य सामान्य माणसे त्याच्या भाग्याचा फैसला करीत असतात. बहुसंख्य माणसे जिवंत हृदयाचीच असतात. आणि जिवंत हृदयाची माणसेच रसिक असतात. म्हणूनच मला " एल्गार "च्या भवितव्याची चिंता नाही. आज मी आशियाचा महाकवी आणि माझे दैवत असलेल्या फ़ैज़ अहमद " फ़ैज़ "च्या शब्दात माझ्या ह्या काव्यसंग्रहाविषयी महाराष्ट्राला एवढेच सांगतो—

**यूँ खूँ की महक है के लबे-यार की खुशबू**
**किस राह की जानिब से सबा आती है देखो !**
**गुलशन में बहार आई के जिन्दाँ हुवा आबाद ?**
**किस सिम्त से नग्मों की सदा आती है देखो !**

हा रक्ताचा दरवळ आहे की प्रियेच्या ओठांचा सुगंध ? हा पूर्वेकडून येणारा पहाटवारा कोणत्या रस्त्याकडून येत आहे ते पहा ! उद्यानात वसंत आला की, तुरुंग गजबजला ? कोणत्या दिशेने गीतांचे गुंजन येत आहे ते पाहा !

सुरेश भट

# हार्दिक आभार

हा 'एल्गार' काव्यसंग्रह प्रसिद्ध होत असतानाच मी महाराष्ट्रातील सामान्य जनतेच्या रसिकतेचे आभार मानतो. माझ्या काव्यगायनाचे जाहीर कार्यक्रम गाजलेही असतील. पण गेल्या कित्येक वर्षांपासून मी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, साध्यासुध्या माणसांच्या घरोघरी माझे काव्य एकवीत आहे आणि त्यांची दाद लुटत आहे. ही माणसे नसती, तर मी इतकी वर्षे कवी म्हणून जिवंतच राहिलो नसतो. त्यांच्याशिवाय मला दुसरा आधारच नव्हता आणि नाही. म्हणून मी भविष्यकाळात याहून अधिक चांगले लिहीन, असे त्यांना कृतज्ञतापूर्वक सांगून मी त्यांचे आभार मानतो.

ह्याचवेळी मी महात्मा ज्योतिबा फुले आणि परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ह्यांना वंदन करतो. माझ्या आभारांची त्यांना गरज नाही. हे दोघे नसते, तर मी जो आज आहे, तो नसतो. हे दोघे नसते, तर मला माझे रसिक मिळाले नसते आणि मी कधीच गाडला गेलो असतो !

ह्याचवेळी मी माझे बंधुतुल्य स्नेही श्री. अरविंद पाटील ह्यांचे प्रेमाने कृतज्ञतापूर्वक स्मरण करतो. जेव्हा मी अज्ञातवासात होतो, तेव्हापासून आजपर्यंत मला ऐकणारा, माझ्याकडून लिहवून घेणारा, जे काय आवडले किंवा नावडले ते मला स्पष्टपणे सांगणारा आणि माझ्या अपूर्ण कविता व गझलांची मला वरचेवर आठवण करून देणारा माझा पहिला रसिक म्हणजे अरविंद पाटील आहे.

मला आज सर्वश्री विद्याधर गाडगीळ, दाजी पणशीकर, अशोक कुळकर्णी आणि कुळकर्णी वहिनींची आठवण येत आहे. माझ्या काव्यलेखनाच्या पाळतीवर राहणारे हेच ते मुंबईकर रसिक.

पण एवढयामुळेच माझ्यावरील उपकारांचे ओझे हलके झालेले नाही. माझा वर्गबंधु आणि गेल्या दोन पिढयांची "वजादारी" कायम राखणारा माझा कौटुंबिक जिव्हाळयाचा मित्र वली उर्र-रहमान सिद्दीकी उर्फ वली ह्याचे मी येथे अभिमानान व कृतज्ञतापूर्वक स्मरण करतो. गझल म्हणजे काय, ह्याची मला संपूर्ण जाणीव करून देण्यात वलीचा सिंहाचा वाटा आहे. हे माझे वक्तव्य त्याला आवडणार नाही. पण त्याला पूर्वकल्पना न देताच मी हे लिहिलेले आहे.

पुण्याचे माझे आदरणीय मित्र प्रा. सुरेशचंद्र नाडकर्णी ह्यांचे मला वेळोवेळी झालेल्या चर्चेच्या स्वरूपात अनेकदा सहाय्य झालेले आहे. गझलच्या ज्ञानाविषयी,

तंत्राविषयी मी ज्याला मानतो, असा मला आढळून आलेला एकमेव मराठी माणूस म्हणजे नाडकर्णीसाहेब आहेत. मीच कशाला, वलीसुद्धा त्यांना मानतो. मी नाडकर्णीसाहेबांचाही कृतज्ञ आहे.

ह्या पुस्तकाच्या वेष्टनावरील सुंदर चार रंगी चित्र तयार करून दिल्याबद्दल मी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सुभाष अवचट ह्यांना आणि मलपृष्ठावरील माझ्या छायाचित्राला जन्म देणारे माझे आवडते फोटोग्राफर श्री. इरशाद हाशमी ह्यांना धन्यवाद देतो.

'एल्गार'च्या वेष्टनाची अप्रतीम छपाई करणाऱ्या नागपूरच्या नाग मुद्रणालयाचे संचालक सर्वश्री दिवाकर व प्रभाकर धाक्रस आणि पुस्तकाची अतिशय देखणी छपाई केल्याबद्दल नारायण मुद्रणालयाचे संचालक बंधू सर्वश्री मधुसूदन पांडुरंग बनहट्टी आणि श्रीकृष्ण पांडुरंग बनहट्टी आणि पुस्तकाची छपाई सुरू असताना आम्हाला वरचेवर चहा पाजणाऱ्या बनहट्टी वहिनींचेही मी आभार मानतो. ह्या पुस्तकासाठी अत्युत्कृष्ट दर्जाचा कागद पुरविणाऱ्या "गोपाल एजन्सीज"चे संचालक श्री. भय्यासाहेब घटाटे ह्यांचे (पुढील आवृत्तीच्या वेळी ते हाच कागद देतील, अशी आशा व्यक्त करून) मी आभार मानतो.

आणि हे सर्व आभार मानताना मी "नाग मुद्रणालय" आणि "नारायण मुद्रणालय" त्या दोन्ही छापखान्यात काम करणाऱ्या माझ्या कामगार बांधवांचे हार्दिक आभार मानतो. त्यांचे परिश्रम आणि कौशल्य मी काही मोबदला देण्यापलिकडे आहे. पण ह्या कुशल कामगारांशिवाय माझ्या पुस्तकाचा जन्मच झाला नसता, हे मी विसरू शकत नाही.

पुनः एकदा सर्वांचे आभार!

सुरेश भट

---

## शुद्धिपत्रक

| गझलेचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| दंश | २४ | पायच वाऱ्याचे | पायच पाऱ्याचे |
| पादुका | ६० | दंगे | दगे |

२५०० दा. क्र. २०११६ काव्य १७१२५८ ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# एल्गार

अद्यापही सुऱ्याला माझा सराव नाही
अद्यापही पुरेसा हा खोल घाव नाही

येथे पिसून माझे काळीज बैसलो मी . .
आता भल्याभल्यांच्या हातात डाव नाही

हे दुःख राजवर्खी . . ते दुःख मोरपंखी . .
जे जन्मजात दुःखी त्यांचा निभाव नाही

त्यांना कसे विचारू – कोठे पहाट गेली ?
त्यांच्यापल्याड त्यांची कोठेच धाव नाही

जी काल पेटली ती वस्ती मुजोर होती
( गावांत सज्जनांच्या आता तणाव नाही )

झाले कुठे फरारी संतप्त राजबिंडे ?
कोठेच आसवांचा बाका बनाव नाही

गर्दीत गारद्यांच्या सामील रामशास्त्री
मेल्याविना मढ्याला आता उपाव नाही

जावे कुण्या ठिकाणी उध्वस्त पापियांनी ?
( संतांतही घराच्या राखेस भाव नाही ! )

उच्चारणार नाही कोणीच शापवाणी . .
तैसा ऋषीमुनींचा लेखी ठराव नाही !

साध्याच माणसांचा एल्गार येत आहे . .
हा थोर गांडुळांचा भोंदू जमाव नाही !

ओठीं तुझ्या न आले अद्याप नाव माझे
अन् ओठ शोधण्याचा माझा स्वभाव नाही

# आम्ही !

जगाची झोकुनी दु:खे सुखाशी भांडतो आम्ही
स्वत:च्या झाकुनी भेगा मनुष्ये सांधतो आम्ही

फुकाचे काय शब्दांना मिळे दिव्यत्व सत्याचे ?
घराची राखरांगोळी कपाळी लावतो आम्ही

कुण्याही चंद्रभागेचा किनारा प्यार आम्हाला
तिथे नाचे विठू झेंडा जिथे हा रोवतो आम्ही

तुरुंगातील स्वप्नांची अम्ही धुंडाळितो स्वप्ने
वधस्तंभांसवे दाही दिशांना हिंडतो आम्ही

दिले प्रत्येक वस्तीला अम्ही आकाश सोनेरी
जिथे जातो तिथे हाका उषेच्या वाटतो आम्ही

जरी या वर्तमानाला कळेना आमुची भाषा
विजा घेऊन येणाऱ्या पिढ्यांशी बोलतो आम्ही !

# आकाश उजळले होते !

इतकेच मला जातांना सरणावर कळले होते
मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते

ही दुनिया पाषाणांची बोलून बदलली नाही
मी बहर इथे शब्दांचे नुसतेच उधळले होते

गेलेल्या आयुष्याचा मधुमास गडे विसरू या
( पाऊल कधी वाऱ्याचे माघारी वळले होते ? )

मी ऐकवली तेव्हाही तुज माझी हीच कहाणी . .
मी नाव तुझे तेव्हाही चुपचाप वगळले होते

याचेच रडू आले की, जमले न मला रडणेही
मी रंग तुझ्या स्वप्नांचे अश्रूंत मिसळले होते

नुसतीच तुझ्या स्मरणांची एकांती रिमझिम झाली
नुसतेच तुझे हृदयाशी मी भास कवळले होते

घर माझे शोधाया मी वाऱ्यावर वणवण केली
जे दार खुले दिसले ते आधीच निखळले होते

मी एकटाच त्या रात्री आशेने तेवत होतो . .
मी विझलो तेव्हा सारे आकाश उजळले होते !

## जाबसाल

आपुल्याच आयुष्याशी जाबसाल झाले . .
जे जबाब आले त्याचे ते सवाल झाले !

मावळून गेले जेव्हा रंग माणसांचे
रंगरंग मिळुनी अवघे रंग लाल झाले !

नकोनको गतकाळाची अर्थहीन चर्चा
( तेच आज घडते आहे जे न काल झाले )

एक हीच शंका माझी अजुनही फिटेना–
" गाव हे फुलांचे होते . . का बकाल झाले ? "

राहिले सुखी ते वेडे जे लढून मेले
जे पळून गेले त्यांचे हालहाल झाले

मी कशास त्यांची आता काळजी वहावी
सूर्यचंद्र ज्या स्वप्नांचे द्वारपाल झाले

## —संक्षेप

हा ठोकरून गेला, तो वापरून गेला . .
जो भेटला मला तो वांधा करून गेला !

वेशीवरी मनाच्या आले सवाल सारे
माझा सवाल माझ्या ओठी विरून गेला

माझ्याविना फुलांची दिंडी निघून गेली
काटाच प्यार आता जो मोहरून गेला

चाहूल ही तुझी की, ही हूल चांदण्याची ?
जो चंद्र पाहिला मी तोही दुरून गेला !

केव्हाच आसवांची गेली पुसून गावे . .
स्वप्नामधेच माझा रस्ता सरून गेला

बोलू कुणास देई आकांत हा सुखाचा ?
मागेच दु:खितांचा टाहो मरून गेला !

कानात कोठडीच्या किंचाळला झरोका –
" बाहेर एक कैदी तारा धरून गेला ! "

आजन्म ही तुझी मी केल्यावरी प्रतीक्षा . .
माझाच भास माझ्या अंगावरून गेला !

# बरं नाही !

हे तुझे अशा वेळी लाजणे बरे नाही
चेहरा गुलाबाने झाकणे बरे नाही

जे तुला दिले होते तेच ओठ दे माझे . .
( मागचे जुने देणे टाळणे बरे नाही )

ऐक तू जरा माझे . . सोड मोह स्वप्नांचा
आजकाल स्वप्नांचे वागणे बरे नाही

जाहली न कोणाची सांग राखरांगोळी ?
आपुलीच रांगोळी काढणे बरे नाही !

आज मोकळे बोलू ! आज मोकळे होऊ !
जीव एकमेकांचा जाळणे बरे नाही

कालचा तुझामाझा चंद्र वेगळा होता . .
हे उन्हात आलेले चांदणे बरे नाही

मैफलीत या माझ्या पाहतेस का खाली ?
हाय, लाजणाऱ्याने जागणे बरे नाही !

## फुटका पेला

शेवटी वेदमंत्रांनी अन्याय एवढा केला
मशहूर ज्ञानया झाला .. गोठ्यातच जगला हेला

अडवून जरी शब्दांनी भरपूर खुशामत केली
दारात वर्तमानाच्या मी अर्थ उद्याचा नेला !

घासते घरोघर भांडी स्वप्नांची राजकुमारी
वणवणतो पोटासाठी हा राजपुत्र अलबेला

ही कुण्या राजधानीची कापती अजुन खिंडारे ?
का कुणी कलंदर येथे गुणगुणत सुळावर गेला ?

पुसतात जात हे मुडदे मसणात एकमेकांना
कोणीच विचारत नाही—“ माणूस कोणता मेला ? ”

जर हवे मद्य जगण्याचे .. जर हवी धुंद जन्माची
तू विसळ तुझ्या रक्ताने हृदयाचा फुटका पेला !

## ओठ

तू नभातले तारे माळलेस का तेव्हा ?
माझियाच स्वप्नांना गाळलेस का तेव्हा ?

आज का तुला माझे एवढे रडू आले ?
तू चितेवरी अश्रू ढाळलेस का तेव्हा ?

हे तुझे मला आता वाचणे सुरू झाले . .
एक पानही माझे चाळलेस का तेव्हा ?

बोलली मिठी माझी—'दे प्रकाश थोडासा !'
तू मला तशा रात्री जाळलेस का तेव्हा ?

कालच्या वसंताला ठेवतेस का नावे;
वायदे फुलायाचे पाळलेस का तेव्हा ?

चुंबिलास तू माझा शब्दशब्द एकांती;
ओठ नेमके माझे टाळलेस का तेव्हा ?

# दीपदान

फुलावया लागलीस तेव्हा मला कुठे देहभान होते
वसंत आला निघून गेला . . मला कुठे वर्तमान होते

असाकसा तो प्रवास होता दिले दगे सारखे तरूंनी
दुपारचे ऊन्ह सावलींच्या सुखातही विद्यमान होते

सवाल माझ्या स्वतंत्रतेला करून आताच ते निघाले
स्वतःच जे चोरट्या सुखाचे निलाजरे बंदिवान होते

तुझ्यापुढे न्यायदेवतेने कबूलही पिंजऱ्यात केले—
' तुझ्या चुका वंदनीय होत्या ! तुझे गुन्हे पुण्यवान होते ! '

अताच कोणी फकीर माझ्या घरापुढे ओरडून गेला
शिकस्त झालास तू न बेटा, तुझे इरादे महान होते !

घरोघरी हीच एक चर्चा—तिचे घराणेच राजवंशी !
( जिते न ते बंडखोर ज्यांचे भिकारडे खानदान होते )

अता स्मरे एवढेच . . तेव्हा कुठेतरी खोल दंश झाला . .
खरेच का सोनकेवड्याचे मनात माझ्याच रान होते ?

असे दिले शब्द श्रृंखलांनी . . असा दिला त्वेष दुःखितांनी
दुभंग मी राहिलो तरीही अभंग माझे इमान होते

तुम्ही मला पाहिलेच कोठे ? तुम्ही मला भेटलाच कोठे ?
जिथे मला गाठले तुम्ही ते जिवंत माझे स्मशान होते

जरा तुझ्या अंगणात आलो . . उनाड वाऱ्यासवे उडालो . .
अता फुलांना विचार, ' येथे खरेच का एक पान होते ? '

मुठीत घेऊन जीव माझा कसातरी जन्म काढला मी
तयार बाहेर सूळ होता . . घरात भिंतीस कान होते

अम्हास फिर्यादही खुनाची तुझ्यापुढे आणता न आली
तुझ्या महालामधील खोजे तुझ्याहुनी बेगुमान होते

म्हणू नका आसवात माझे बुडून केव्हाच स्वप्न गेले
उदास पाण्यात सोडलेले प्रसन्न ते दीपदान होते

## चंद्र आता

चंद्र आता मावळाया लागला
प्राण माझाही ढळाया लागला

काय तो वेडा इथेही बोलला ?
हा शहाणाही चळाया लागला !

ओठ ओठांना सतावू लागले . .
श्वास गालाला छळाया लागला

हालते भिंतीवरी छाया तुझी . .
दीप हा कैसा जळाया लागला ?

मी खरे बोलून जेव्हा पाहिले
हा टळाया . . तो पळाया लागला !

हाक दाराने मला जेव्हा दिली
उंबरा मागे वळाया लागला !

तोच मी होतो . . गडे हा तोच मी
जो तुला आता कळाया लागला

## वय निघून गेले

देखावे बघण्याचे वय निघून गेले
रंगांवर भुलण्याचे वय निघून गेले

गेले ते उडुन रंग
उरले हे फिकट संग
हात पुढे करण्याचे वय निघून गेले

कळते पाहून हेच
हे नुसते चेहरेच
चेहऱ्यांत जगण्याचे वय निघून गेले

रोज नवे एक नाव
रोज नवे एक गाव
नावगाव पुसण्याचे वय निघून गेले

रिमझिमतो रातंदिन
स्मरणांचा अमृतघन
पावसात भिजण्याचे वय निघून गेले

हृदयाचे तारुणपण
ओसरले नाही पण
झंकारत झुरण्याचे वय निघून गेले

एकटाच मज बघून
चांदरात ये अजून
चांदण्यात फिरण्याचे वय निघून गेले

आला जर जवळ अंत
कां हा आला वसंत ?
हाय, फुले टिपण्याचे वय निघून गेले

## तुझ्यासाठी

गीत आसावले तुझ्यासाठी !
सूर खोळंबले तुझ्यासाठी !

तू मला अर्थ दे अजून तरी
शब्द ओलांडले तुझ्यासाठी !

ही तुझी रात . . हे तुझे तारे . .
श्वास घेती फुले तुझ्यासाठी !

दूर . . येथून दूर . . दूर . . तिथे–
चांदणे थांबले तुझ्यासाठी !

का तुला सोडवे न गाव तुझे ?
मी मला सोडले तुझ्यासाठी !

## वाटचाल

ही न मंजूर वाटचाल मला
दे भविष्या तुझी मशाल मला

संत समजून काल मी गेलो
भेटला शेवटी दलाल मला

सांग मी काय नेमके बोलू ?
सांग माझाच तू सवाल मला !

घे तपासून आपुले डोळे . .
दाखवूही नको रुमाल मला !

नाव घेऊ कुणाकुणाचे मी ?
(सोसतो मीच आजकाल मला !)

मी कधीचा उभाच फिर्यादी . .
वाकुल्या दाखवी निकाल मला !

तू न बाहेर भेटतेस तरी
जाणवे आत हालचाल मला

एवढीही करू नका माया
(वेळ आल्यावरी विकाल मला !)

ये, लपेटून चांदणे घेऊ . .
तू कशाला दिलीस शाल मला ?

कोणती रीत ही निरोपाची ?
लागला हा कसा गुलाल मला ?

## अवेळीचा पाऊस

अचानक कोसळली पावसाची सर
अलगद उतरले थेंब भुईवर
इथे, तिथे, जागोजाग झाली शिंपडण
( कुण्या काळजाचे दु:ख झाले अनावर ? )

इवल्याशा स्पर्शांनीच रान शहारले
मंद गारव्यात पानपान थरारले
पांघरून आभाळाचे गीत ओलेचिंब
वळवून कूस थवे फुलांचे झोपले !

मधुनीच चुळबूळ होई गवतात
मधुनीच चिवचिव होई घरट्यात
मधुनीच लकाकता नि:शब्द प्रकाश
मुक्यानेच बोलायास लागे आसमंत

ठाईठाई गगनाचे ओठ उमटले
पुन्हा सुगंधाचे पंख मातीस फुटले
आज रात्री बावरल्या वासरासमान
पुन्हा धरणीचे स्वप्न धावत सुटले !

# अजून काही

तुझ्या नभाला गडे किनारे अजून काही
तिथेच जाऊन वेच तारे अजून काही

जरी सुखाच्या निवांत दारास मी नकोसा
खुली व्यथांची सताड दारे अजून काही

तसा न रस्त्यात आज धोका मला परंतू
घरात येतात वाटमारे अजून काही

गडे मला सांग तूच माझीतुझी वदंता
विचारते गाव हे बिचारे अजून काही

तुम्ही कुठे आमुच्या दिशा बंदिवान केल्या ?
सणाणती बंडखोर वारे अजून काही

थकून गेलो तरी फुलांचा सुरूच हेका—
'अजून गा रे . . अजून गा रे . . अजून काही . .'

करू नका एवढ्यात चर्चा पराभवाची
रणात आहेत झुंजणारे अजून काही !

विझून माझी चिता युगे लोटली तरीही
विझायचे राहिले निखारे अजून काही

## हा असा चंद्र

हा असा चंद्र . . अशी रात फिरायासाठी
तूच नाहीस इथे हात धरायासाठी

चेहरा तो न इथे ही न फुलांची वस्ती !
राहिले कोण अता सांग झुरायासाठी ?

कालचे तेच फिके रंग नकोसे झाले
दे तुझे ओठ नवा रंग भरायासाठी !

आडवी एक तिथे भिंत मनाची आली . .
दार होतेच कुठे आत शिरायासाठी ?

नेहमीचेच जुने घाव कशाला मोजू ?
ये गडे आज उभा जन्म चिरायासाठी !

काय आगीत कधी आग जळाली होती ?
लोक नेतील मला खोल पुरायासाठी !

## भीमवंदना

भीमराया घे तुझ्या या लेकरांची वंदना !
आज घे ओथंबलेल्या अंतरांची वंदना !

दुमदुमे 'जयभीम'ची
गर्जना चोहीकडे
सारखा जावे तिथे
हा तुझा डंका झडे

घे, अता घे राहिलेल्या संगरांची वंदना !

कोणते आकाश हे ?
तू अम्हा नेले कुठे ?
तू दिलेले पंख हे . .
पिंजरे गेले कुठे ?

या भराऱ्या आमुच्या . . ही पाखरांची वंदना !

कालचे सारे मुके
आज बोलू लागले
अन् तुझ्या सत्यासवे
शब्द तोलू लागले

हे वसंता, घे मनांच्या मोहरांची वंदना !

एक आम्ही जाणतो
आमची तू माउली
एवढे आहे खरे
आमुची तू सावली

घे अम्ही त्यांना दिलेल्या उत्तरांची वंदना !

जाळले गेलो तरी
सोडले नाही तुला
कापले गेलो तरी
तोडले नाही तुला
ही तुला उध्वस्त झालेल्या घरांची वंदना !

तू उभा सूर्यापरी
राहिली कोठे निशा ?
एवढे आम्हा कळे
ही तुझी आहे दिशा !
मायबापा, घे उद्याच्या अंकुरांची वंदना !

धम्मचक्राची तुझ्या
वाढवू आम्ही गती
हा तुझा झेंडा अम्ही
घेतलेला सोबती
ऐक येणाऱ्या युगांच्या आदरांची वंदना !

## आरास

रोजचे आरोप येती माझिया दारी
बोलतो मी साफ, ही माझी गुन्हेगारी !

घास मी घेताच त्यांनी ओरडा केला
(काय त्यांच्या ढेकरा होत्या निराहारी ?)

हा तुझा आसूडही माझ्या भल्यासाठी
पाठ आभारी तुझी . . हे रक्त आभारी !

काळ ओलांडून आलो मी तुझ्यापाशी . .
धाडला माझा निकामी देह माघारी

न्याय मागावयास केला व्यर्थ मी त्रागा
आसवे होती कुठे माझी सदाचारी ?

हा असा आजार, कोणी वाचला नाही
औषधेही येथली आहेत आजारी !

सापडाया लागली मोडीतली नाती
मी कसा हिंडू मनाच्या चोरबाजारी ?

थांबवा हा वाद, स्वप्नांनो हळू बोला . .
(झोपले आहेत माझे सभ्य शेजारी !)

मी जरी आरास माझी मांडली नाही
ऐक तू टाहोच हा माझा अहंकारी !

## जरासा

अता राहिलो मी जरासा जरासा
उरावा जसा मंद अंती उसासा

कसा कोरडा कोरडा जन्म गेला
कसा रोज मी पीत गेलो पिपासा

कसे ओठ तू बंद केलेस माझे
करावा कसा आसवांनी खुलासा ?

गडे सांग हा घाव आहे कुणाचा ?
तुझा चेहरा वाटतो पाहिलासा !

असे हे कसे जीवनाचे दिलासे ?
दिलाशांस मी देत आहे दिलासा !

## वार्ता

दिवसाच चोरट्यांनो जाळू नका मशाली
अजुनी न सूर्य केला तुमच्या कुणी हवाली !

माळू नकोस तू ही माझी भणंग स्वप्ने . .
माझ्यातुझ्या फुलांची मागेच राख झाली

दिसतात चोरलेल्या रस्त्यातल्या कमानी . .
कुठल्या तरी यशाची तिरडी पुढे निघाली

लढती सुपातले हे दाणे परस्परांशी
( गळणार पीठ ज्यांचे जात्यामधून खाली )

पिटतो जनावरांचा हा संत रोज टाळ्या
का माय माणसांची आम्हास व्यर्थ व्याली ?

माझे जगावयाचे अप्रूप एवढे की,
जमले मला बघाया मुडदेच भोवताली !

इतुका न आसवांना कोणीच दोष द्यावा
ज्यांचे कुणी न त्यांची ही आसवेच वाली

उरली विरंगुळ्याला ही सांजवेळ माझी
( उरल्या तुझ्या जराशा प्राणात हालचाली ! )

तुमच्या न बोलण्याचा उपयोग काय झाला ?
माझ्यापर्यंत माझी वार्ता अखेर आली !

## एकटी

मी एकटीच माझी असते कधीकधी
गर्दीत भोवतीच्या नसते कधीकधी

येथे न ओळखीचे कोणीच राहिले
होतात भास मजला नुसते कधीकधी

जपते मनात माझा एकेक हुंदका
लपवीत आसवे मी हसते कधीकधी

मागेच मी कधीची हरपून बैसले
आता नकोनकोशी दिसते कधीकधी

जखमा बुजून गेल्या साऱ्या जुन्या तरी
उसवीत जीवनाला बसते कधीकधी

## अफवा

सूर ओळखीचे सारे सोडुनी निघाले
माझियाच अंगावरती उलट शब्द आले

असा कसा आयुष्याने दिला मला धोका
काळजास पटला नाही आपुलाच ठोका

अता मीच माझी चर्चा मजसवे करावी
अता मीच माझी अफवा मला ऐकवावी

## हुंदके

वागणे माझे जरी साधेच होते..
दाबलेले हुंदके ताजेच होते !

पीत मी गेलो जरी पेला रिकामा
झिंगण्याचे हाय बोभाटेच होते !

ते मुके अश्रू न होते माणसांचे
ते सुखाचे सभ्य कांगावेच होते !

मी जिथे गेलो तिथे निश्चिन्त होतो
( दुःख माझे माझियामागेच होते ! )

हे अता देती मला खांदा कशाला ?
प्राण ज्यांनी घेतला ते हेच होते !

मी न केली खंत माझ्या चेहऱ्याची
पाहिलेले चेहरे माझेच होते

नीज ती होती अखेरीची तरीही
( अंतरी माझ्या कुणी जागेच होते )

गाव सोडावयास केली मीच घाई
लोक मी गेल्यावरी आलेच होते !

काय तू केलेस आयुष्या फुलांचे ?
श्वासही माझे कसे काटेच होते !

## दंश

येणारा दिवस मला हेटाळत हसणारच
जाणारा दिवस मला जातांना डसणारच

वरवरच्या बोलण्यात गेली बघ सरुन रात्र . .
मावळता चंद्र तुझे नाव मला पुसणारच

देतांना हृदय तुला केला मी हा विचार–
' घेणारा घेणारच ! देणारा फसणारच !'

हारुनही लाखवार माझी झाली न हार
मी माझ्या स्वप्नांना फिरफिरून पिसणारच !

माझे घर वाऱ्याचे अन् पायच धाऱ्याचे पायाचे
मी जगास रस्त्यावर गातांना दिसणारच !

काही भलतेच लोक तेव्हा करतील शोक
तेव्हाही मी त्यांच्या आसवांत नसणारच !

## उडी

आता उनाड शब्द वळायास लागले !
सारे लबाड अर्थ कळायास लागले !

केले न मी उगीच गुन्हेगार सोबती . .
आरोप आपसूक टळायास लागले !

आली पुन्हा मनात नको तीच चिंतने . .
( काही मधाळ चंद्र ढळायास लागले )

घायाळ मी असून रणी खूप झुंजलो
ज्यांना न घाव तेच पळायास लागले !

माझ्या मिठीत सांग मला पाप कोणते ?
हे चांदणेच व्यर्थ चळायास लागले !

माझ्याच झोपडीस कुठे आग लागली ?
सारे गरीब गाव जळायास लागले !

केलास हा सवाल नवा तू कसा मला ?
आता जुने सवाल छळायास लागले !

कोणी नभात सूर्य विकायास काढला ?
येथे प्रसन्न ऊन्ह मळायास लागले !

आणू तरी कुठून रडायास आसवे ?
डोळ्यांमधून रक्त गळायास लागले !

जात्यात गातगात उडी मीच घेतली . .
आयुष्य सावकाश दळायास लागले !

## पाहिजे तसे

आसवांचे जरी हसे झाले
हे तुला पाहिजे तसे झाले

चंद्र आला . . निघूनही गेला . .
ऐनवेळी असे कसे झाले ?

शोधुनी मी तुला कुठे शोधू ?
चेहऱ्यांचेच आरसे झाले !

पाहिले दु:ख मी तुझे जेव्हा . .
दु:ख माझे लहानसे झाले !

आग ओकून मी किती ओकू ?
शब्द सारेच कोळसे झाले !

संपले हाय बोलणे माझे
जे तुझ्याशी कसेबसे झाले !

# खुलासे

मी खुलासेही कशासाठी करावे ?
लोक पाठीमागुनी घेतात चावे !

ही सुखाच्या इंद्रजालाचीच जादू
पिंजऱ्याला मानिती आकाश रावे !

या फुलांना सारखा दुर्गंध येई . .
हे वसंताचे गटारी बारकावे !

छाकटे दुर्वास का निवृत्त झाले ?
शापितांनी काय छाट्यांचे करावे ?

या पिशाच्च्यांच्या कशा आबाद वस्त्या ?
माणसांची ही कशी ओसाड गावे ?

सांगतो जल्लाद रक्ताचा घरोबा
( सांडलेले रक्त का होते परावे ? )

कोणते नाहीत डोळे आज ओले ?
आसवांनी आसवांना काय द्यावे ?

पाहुनी घ्यावे भविष्याच्या दिठीने . .
बोलण्यासाठी जगाचे ओठ व्हावे !

काय साधी माणसे बोलून गेली ?
घेतले सिंहासनाने हेलकावे !

जन्मले घेऊन जे पायात काटा
त्या भणंगांनीच यात्रेला निघावे

देश हा बेमान झालेल्या ऋतूंचा
येथले आषाढसुद्धा आगलावे !

## भल्या पहाटे निघून आले

सख्या तुला भेटण्यास मी या भल्या पहाटे निघून आले
घरातुनी चोरपावलांनी लपून आले . . जपून आले

तुझ्याच स्वप्नात रात गेली . . तुझ्याच स्वप्नात जाग आली
तुझ्याच स्वप्नात जागणाऱ्या जगातुनी मी उठून आले

विचारले मी न अंबराला . . विचारले मी न वारियाला . .
तुझ्या मिठीचा निरोप आला – मिठीत मी मोहरून आले !

अताच हा दूर तारकांचा कुठेतरी काफिला निघाला
अताच हे चांदणे गुलाबी हळूच मी पांघरून आले

गडे मला बोलता न आले, कुणीकुणी बोललेच नाही . .
अखेर माझ्याच आसवांना तुझा पता मी पुसून आले !

## दाखला

मुका पाऊस एकांती मुक्याने बोलला होता
कुणाचा हुंदका माझ्या गळ्याशी दाटला होता

इथे मी सोसला माझा अशासाठीच बोभाटा–
कळ्यांची काळजी होती ! फुलांचा मामला होता !

अता मागून मी माझ्या मनाला सांगतो आहे–
'अरे, हा आपला होता ! अरे, तो आपला होता !'

मला आणून दे आधी जुन्या खाणाखुणा माझ्या
( तुला तेव्हा म्हणे माझा सुगावा लागला होता )

तुझ्या दाही दिशा होत्या . . तुझा होता खुला वारा . .
मला आजन्म दुःखांनी गराडा घातला होता !

मला बोलायचे होते . . कुणी बोलू दिले नाही
जसा आधीच केलेला जुना तो फैसला होता !

बरे झाले, जगायाचे दिले फेकून मी ओझे
इथे खोट्या जिव्हाळ्यांचा खरा धोका मला होता !

मला त्यांचे हसू आले भविष्याच्या महाद्वारी . .
कुणापाशी न येणाऱ्या पिढ्यांचा दाखला होता !

## मी गजांना सांगतो . .

या फुलांनी छेडिली रानात गाणी
का गडे आलीस तू ह्याही ठिकाणी ?

तू सुखा सांगू नको माझी खुशाली
हे पहा आले तुझ्या डोळ्यात पाणी !

हा तुझामाझा खरा एकांत नाही . .
( कांकणांना का फुटे आताच वाणी ? )

रोज दुःखी लोक हे दारात येती
रोज माझी वेदना ओशाळवाणी !

मी जरी नक्षत्रदेशातून आलो
माणसांची शोधतो आहे निशाणी

वाट काळाच्या नदीने बंद केली . .
एकटी घाटावरी माझी विराणी

ऐकले नाही जरी माझे कुणीही
मी गजांना सांगतो माझी कहाणी !

## यार हो !

सूर्य केव्हाच अंधारला यार हो
या, नवा सूर्य आणू चला यार हो

हे नवे फक्त आले पहारेकरी
कैदखाना नवा कोठला यार हो ?

ते सुखासीन संताप गेले कुठे
हाय, जो तो मुका बैसला यार हो

चालण्याची नको एवढी कौतुके
थांबणेही अघोरी कला यार हो

जे न बोलायचे तेच मी बोलतो
मीच माणूस नाही भला यार हो

सोडली मी जरी स्वप्नभूमी तरी
जीवनाची टळेना बला यार हो

हासण्याची मिळाली अनुज्ञा कधी ?
हुंदकाही नसे आपला यार हो

ओळखीचा निघे रोज मारेकरी
ओळखीचाच धोका मला यार हो

लोक रस्त्यावरी यावया लागले
दूर नाही अता फैसला यार हो !

आज घालू नका हार माझ्या गळा
( मी कुणाचा गळा कापला यार हो ! )



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2500
2996

## वेळ झाली

ही कहाणी तुझ्याच न्हाण्याची
तापलेल्या अधीर पाण्याची

'नाव' हे त्या तुझ्या दिवाण्याचे
( काळजी घे जरा उखाण्याची )

कोणती जात हाय प्रेमाची ?
वेदना कोणत्या घराण्याची ?

राग नाही तुझ्या नकाराचा
चीड आली तुझ्या बहाण्याची !

मी न केला हिशेब स्वप्नांचा
जिंदगी चोपडी न वाण्याची !

गुंजतो हा मुका तुरुंग पुन्हा
छेडली मी लकेर गाण्याची

लोक आले ! अताच का आले ?
वेळ झाली निघून जाण्याची !

## तोरण

आता जगायाचे असे माझे किती क्षण राहिले ?
माझ्या धुळीचे शेवटी येथे किती कण राहिले ?

ह्रदयात विझला चंद्रमा . . नेत्री न उरल्या तारका . .
नाही म्हणायाला तुझे हे आपुलेपण राहिले

अजुनी कुणास्तव तेवतो हा मंद प्राणाचा दिवा ?
अजुनी मला फसवायला कुठले निमंत्रण राहिले ?

ते लोक होते वेगळे घाईत जे गेले पुढे . .
मी मात्र थांबुन पाहतो—मागे कितीजण राहिले ?

कवटाळुनी बसले मला दाही दिशांचे हुंदके
( माझे अता दुःखासवे काही न भांडण राहिले ! )

होता न साधा एवढा जो शब्द मी तुजला दिला
एकाच शब्दाला उभे आयुष्य तारण राहिले !

अवघ्या विजा मी झेलल्या, सगळी उन्हे मी सोसली . .
रे बोल आकाशा, तुझे आता किती पण राहिले ?

ओसाड माझे घर मुळी नाही बघायासारखे
हे आसवांचे तेवढे अद्याप तोरण राहिले !

## एवढेतरी . .

एवढेतरी करून जा
हा वसंत आवरून जा

ही न रीत मोहरायची
आसवांत मोहरून जा

तारकांपल्याड जायचे
ह्या नभास विस्मरून जा

ये उचंबळून अंतरी
सावकाश ओसरून जा

ह्या हवेत चंद्रगारवा . .
तू पहाट पांघरून जा

ये गडे, उदास मी उभा
आसमंत मंतरून जा

## पाहिले वळून मला

कळे न काय कळे एवढे कळून मला
जगून मीच असा घेतसे छळून मला

तुरुंग हाच मला सांग तू कुठे नाही ?
मिळेल काय असे दूरही पळून मला

पुसू कुणास कुठे राख राहिली माझी ?
उगीच लोक खुळे पाहती जळून मला

खरेच सांग मला . . काय ही तुझीच फुले ?
तुझा सुगंध कसा ये न आढळून मला ?

जरी अजून तुझे कर्ज राहिले नाही
अजून घेत रहा जीवना पिळून मला

उजाडलेच कसे ? ही उन्हे कशी आली ?
करी अजून खुणा चंद्र मावळून मला

कधीच हाक तुझी हाय ऐकली नाही
अखेर मीच पुन्हा पाहिले वळून मला !

## भेट

दूर तारे थरारले होते
( मी नको ते विचारले होते )

तोल गेला खरा तुझामाझा
चांदण्यानेच भारले होते

हा गुन्हेगार मी तुझा दुनिये
–एक आसू उगारले होते !

तू फुलांनाच मागतेस दिशा
( मी नभाला झुगारले होते )

सांग मी हारलो कुठे केव्हा ?
हाय, आयुष्य हारले होते !

बोललो काय ? बोललोच कुठे ?
ओठ केव्हाच वारले होते !

सांजवेळीच भेटलीस कशी ?
मी पहाटे पुकारले होते !

## चुकामूक

दिलास तू शाप जीवनाच्या उनाडकीचा
विचारला मीच प्रश्न तेव्हा तुला चुकीचा

अताच सारे कसे इथे शांतशांत होते !
अताच मी ऐकला पुन्हा बार बंदुकीचा

किती किती कौतुके करू मी तुझ्या घराची ?
प्रपंच हा नाटकातल्या राम-जानकीचा !

कशास मी रक्त दाखवू आपुले कुणाला ?
( अजूनही घाव हा तसा त्या न लायकीचा )

अता इथे राहतात आवाज हुंदक्यांचे
खरेच हा गाव माणसांच्या भुताटकीचा

जरी तुझ्या पाकळ्यांत मी गुंतलो तरीही
गडे, तुझा हा सुगंध माझ्या न मालकीचा

अता जगू चांदण्यातल्या चाहुलींप्रमाणे
करार माझातुझा असा ह्या चुकामुकीचा

## उशीर

हेही असेच होते, तेही तसेच होते
आपापल्या ठिकाणी सारे ससेच होते !

केले न बंड कोणी . . त्या घोषणाच होत्या !
ज्यांनी उठाव केला तेही घसेच होते !

आला न गंध त्यांना केव्हाच चंदनाचा . .
सारे उगाळलेले ते कोळसेच होते !

तू भेटलीस तेव्हा मी बोललोच नाही
तू भेटतेस तेव्हा माझे असेच होते !

होती न ती दयाही . . ती जाहिरात होती !
जे प्रेम वाटले ते माझे हसेच होते !

झाला उशीर जेव्हा हाका तुला दिल्या मी . .
मातीत पावलांचे काही ठसेच होते !

# चहाडी

कशी ही बोलकी झाली घरे ओसाड गावाची
सुने रस्तेच हे गाती पुन्हा गीते उठावाची

जगा रे, मी मला येथे विकाया आणले नाही
कधी मी चौकशी केली तुझ्या बाजारभावाची ?

तुझ्या अश्रुंहुनी माझे निराळे कोणते अश्रू ?
तुझ्या एकेक घावाची कथा माझ्याच घावाची !

अशा वेळी तरी बाई जरा तू ऐक चंद्राचे
अशा वेळी कशी घाई तुला अर्घ्याच डावाची ?

कशी आता करू गोळा पुन्हा मी राख जन्माची
(पुन्हा केलीस तू चर्चा म्हणे माझ्याच नावाची)

अता फासावरी हा मी हसाया लागलो आहे
तुझ्या न्यायास मी संधी दिली नाही बचावाची !

जरा बोलून मी आलो परागंदा सुगंधांशी
चहाडी मी कुठे केली वसंताच्या स्वभावाची ?

## स्मशानयात्रा

येथे कुणीच नाही माझ्यापरी दिवाणे
मी गीत गात आहे येथे गुन्ह्याप्रमाणे

दे जीवना मला तू आता नवी निराशा
हे दुःख नेहमीचे झाले जुनेपुराणे !

तेव्हा मला फुलांचा कोठे निरोप आला ?
माझे वसंत होते सारे उदासवाणे

सांगू नकोस की, मी तेव्हा जिवंत होतो
तेव्हा जिवंत होते माझे मरून जाणे

साधीसुधी न होती माझी स्मशानयात्रा . .
आली तुझी निमित्ते ! आले तुझे बहाणे !

## कापूर

मी असा त्या बासरीचा सूर होतो
नेहमी ओठांपुनी मी दूर होतो

प्रीतही आली फुलांच्या पावलांनी
हाय, मी चिंध्यांत माझ्या चूर होतो

राहिल्या आजन्म चिंतामुक्त चिंता
मी घरोब्याचे जुने काहूर होतो

तू किती केलास भेटीचा अचंबा
भूतकाळाचा जणू मी धूर होतो

मी न साधी चौकशी केली घनांची
ऐन वैशाखातला मी पूर होतो !

कोणत्या स्वप्नास आता दोष देऊ ?
जीवनाला मीच नामंजूर होतो !

तेवते आहेस तू पूजेत कोठे ?
एकदा मीही तुझा कापूर होतो !

## जगणे

पुन्हा पुन्हा चूक तीच ती मी करीत गेलो
तुझा खुनी हात जीवना मी धरीत गेलो

जरी तिथे दूर वाजले पाय श्रावणाचे . .
इथेच मी धूळ कोरडी पांघरीत गेलो

जरी तुझी चांदरात माझ्या मिठीत होती
उरातले अंतराळ मी आवरीत गेलो

जिथेजिथे बोचले मला साळसूद काटे
तिथेतिथे मी फुलांविना मोहरीत गेलो

जगावयाला मला कुठे श्वासही मिळाले ?
दिलेस जे दुःख तेच मी वापरीत गेलो !

## आळंदी

जरी ओठांवरी येती नभाचे शब्द स्वच्छंदी
मला बोलायची बंदी, तुला ऐकायची बंदी !

उपाशी लोकहो आली दिवाळी राजपुत्रांची
दिवे जाळून रक्ताचे करा अंधार आनंदी !

कसा घ्यावा तुझ्यापाशी विसावा श्रांत चंद्राने ?
तुझ्या डोळ्यात स्वप्नांचा उभा वाडा चिरेबंदी !

चला गाऊ सुगंधाची पुन्हा बेकायदा गाणी
फुलांना टाळते आहे वसंताची रजामंदी

दिवाळे काढुनी हा मी कधीचा मोकळा झालो . .
तुला भंडावते आहे तुझी तेजी, तुझी मंदी

इथे मागून ही माझी समाधी बांधली गेली
जिथे मी गाडला गेलो अरे ही तीच आळंदी !

# अखेरचे थेंब

पुन्हा स्मशानी घडायचे ते घडून गेले
चितेवरी लोक जे नको ते रडून गेले

दिले कशाला नभास झोके तुझ्या स्वरांनी ?
कधीच गाणे तुझे मला शिंपडून गेले

अरे, नसे हा सवाल माझ्याच आसवांचा
युगायुगांचे रुमाल सारे सडून गेले !

करू तरी काय सांग माझ्या कलंदरीचे ?
कसा फिरू ? आसवांत रस्ते बुडून गेले !

कुणाकुणाची कितीकिती खंत बाळगू मी ?
आताच आयुष्यही शिवी हासडून गेले !

सुगंध तो कालचा तुला मी कोठून देऊ ?
अखेरचे थेंब अत्तराचे उडून गेले !

## आनंद

आसवांना कोणता अधिकार होता ?
घाव जो केलास तो सुकुमार होता !

चालण्यासाठी उन्हाची वाट होती
सांत्वनासाठी तुझा संसार होता

ऐकले झंकार तारुण्य तुझे मी
( माझियासाठी कुठे झंकार होता ? )

एक मी निःशब्द किंकाळीच होतो . .
ऐकण्यासाठी सुना बाजार होता

ती पहाटेने दिलेली हूल होती
तो प्रकाशाचा नवा अंधार होता

वाढले जेव्हा जरा छातीत ठोके
वाटले की, तो तुझा होकार होता

ह्याच आनंदात माझा प्राण गेला
कापला ज्याने गळा तो यार होता !

# झाडली राख मी

रात गेली निघून पाऱ्याची
हाक आली पहाटताऱ्याची

तू कहाणी सुनावलीस तुझी
( ही कहाणी न त्या बिचाऱ्याची ! )

फुंकरीचीच ही अशी दुनिया
वाट पाहू नका इशाऱ्याची

हे कुणाचे अधांतरी खोपे ?
बांधलेली हवा निवाऱ्याची !

शांत झाल्या जरी तशा लाटा . .
लाट आली तुझ्या किनाऱ्याची !

हे विचारू नये भिकाऱ्यांनी–
'कोणती जात ह्या भिकाऱ्याची ?'

संपलेलीच पायपीट तुझी
ती पहा दूर वेस वाऱ्याची !

बोललो काय मैफलीत असे ?
झाडली राख मी निखाऱ्याची !

# चेहरा

तुला हवा तसा धरू कुठून चेहरा
उधार आणला न मी अजून चेहरा

तुझा रुकार की तुझा नकार ऐकतो ?
प्रकाशतो पुनःपुन्हा विझून चेहरा

अरे, सुखात नासली तुझी स्वतंत्रता
कधीच टाकलास तू विकून चेहरा !

कळे न जीव हे कसे जिवंत राहती
कसे नटून चालती नसून चेहरा !

भविष्य नाव घेउनी करील फैसला
गरीब लोक राखती म्हणून चेहरा

कुणी न आरशात अन् कुणी न अंतरी . .
अधांतरीच राहिला चुकून चेहरा !

कितीक चाचपायचे अजून चेहरे ?
निघे नवाच चेहऱ्यामधून चेहरा !

तुला जरी फिरून मी कधी न पाहिले
तुझा मनात ठेवला जपून चेहरा !

## आग

कालची बातमी खरी नाही
हाय, स्वर्गात भाकरी नाही

देवदूता तुझा पगार किती ?
कां मला सांग नोकरी नाही ?

तू मला घातलीस भीक जरी
ही तुझी मागणी बरी नाही

येथली सर्व ही घरे माझी
सांग, मी कोणत्या घरी नाही ?

मागता काय लेखणी माझी . .
ही कुणाचीच बासरी नाही !

एकट्याचाच हा सवाल नसे
आग ही कोणत्या उरी नाही ?

राहिले काय पूर्णिमेत अता ?
चंद्र माझा उशीवरी नाही !

## आता असे करू या !

नाही म्हणावयाला आता असे करू या
प्राणात चंद्र ठेवू — हाती उन्हे धरू या

आता परस्परांची चाहूल घेत राहू
आता परस्परांच्या स्वप्नात वावरू या

नेले जरी घराला वाहून पावसाने
डोळ्यातल्या घनांना हासून आवरू या

गेला जरी फुलांचा हंगाम दूरदेशी
आयुष्य राहिलेले जाळून मोहरू या

ऐकू नकोस काही त्या दूरच्या दिव्यांचे . .
माझ्यातुझ्या मिठीने ही रात्र मंतरू या

हे स्पर्श रेशमी अन् हे श्वास रेशमाचे . .
ये ! आज रेशमाने रेशीम कातरू या

## शब्द येतील !

नाव माझे फुलांनी विचारू नये
नाव सांगेन तेव्हा शहारू नये

ही कुण्या एकट्याची लढाई नसे
एकट्यानेच झेंडा उभारू नये

ना कुणाचीच स्वप्नांवरी मालकी
डोळियांनी कुणाच्या फुशारू नये

सोबतीला बरे लोक साधेसुधे
तारकांनी मला हाक मारू नये

मी तुझा चेहरा . . मी तुझे लाजणे
आरशाला गडे दूर सारू नये

जो तयांना हवा तो नसे प्रश्न हा
—हा असा प्रश्न कोणी विचारू नये !

हा पहा लागला अर्थ बोलावया
( शब्द येतील, त्यांना पुकारू नये ! )

२५०० दा. क. २७.११६ काव्य १७५४८ ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## आवाज बंद यंदा !

बांधू हवेत किल्ला बाकाबुलंद यंदा
त्या क्रांतिकारकांचा आवाज बंद यंदा

प्रत्येक चेहऱ्याचा मी आरसा तरीही
माझ्याच दर्शनाचा मी अर्जमंद यंदा

झालो महाग एका थेंबास मी परंतू
माझी चढे रिकाम्या पेल्यास धुंद यंदा

सध्या दिसे तसा हा त्रेतायुगात होता
झाला न धर्मयोद्धा हा लालबुंद यंदा

जो झुंजणार होता तो हा नसे रिसाला
ही फौज गाढवांची जी नालबंद यंदा

जे ऐकणार होते त्यांचेच कान गेले
काही न बोलण्याचा आम्हास छंद यंदा

सांगाच भाविकांनो माझे विमान कोठे ?
संतांसमान केले मी लंदफंद यंदा

त्यांच्या समर्थनांचे होते गुन्हे असे की,
माझे जुने गुन्हे मी केले पसंद यंदा

ह्या घोषणा तुझ्या अन् ह्यांना तुझीच शंका . .
हे प्रेषिता नवा दे नारा बुलंद यंदा

ते वेगळेच काटे होते इथे गुदस्ता
हे वेगळेच काटे खाती मरंद यंदा

गा जाळल्या घरांनो, गा कापल्या शिरांनो
त्वेषात गा, फुलांचा आवेश मंद यंदा !

## केव्हा तरी पहाटे

केव्हातरी पहाटे उलटून रात्र गेली
मिटले चुकून डोळे हरवून रात्र गेली

कळले मला न केव्हा सुटली मिठी जराशी
कळले मला न केव्हा निसटून रात्र गेली

सांगू तरी कसे मी वय कोवळे उन्हाचे ?
उसवून श्वास माझा फसवून रात्र गेली !

उरले उरात काही आवाज चांदण्याचे . .
आकाश तारकांचे उचलून रात्र गेली !

स्मरल्या मला न तेव्हा माझ्याच गीतपंक्ती
मग ओळ शेवटाची सुचवून रात्र गेली !

आता कुशीत नाही ती चंद्रकोर माझी . .
( हलकेच कूस माझी बदलून रात्र गेली )

अजुनी सुगंध येई दुलईस मोगऱ्याचा . .
गजरा कसा फुलांचा विसरून रात्र गेली ?

## विचारू लागलो

माणसांना हाक मारू लागलो
बंद खोल्यांना पुकारू लागलो

श्वास मी तेव्हा चुकीने घेतले
चूक ती आता सुधारू लागलो

पाहिल्या जेव्हा सुखाच्या मी गुढ्या . .
वेदना माझी उभारू लागलो !

कोणते नाते गडे माझेतुझे ?
मी कशासाठी फुलारू लागलो ?

तो कसा होता भ्रमाचा कुंचला
चेहरे खोटे चितारू लागलो

उत्तरे जेव्हा दिली नाही कुणी . .
प्रश्न प्रेतांना विचारू लागलो !

## भिंत खचली कशी ?

भिंत खचली कशी ? दार फुटले कसे ?
हात बेड्यांतुनी आज सुटले कसे ?

बंद आतून तू . . बंद बाहेर तू . .
माणसांशी तुझे बंध तुटले कसे ?

हा विकाऊ असा चंद्र नाकार तू
चांदणे हे तुला सांग पटले कसे ?

बोललो मी कधी ? ऐकले तू कधी ?
हे महात्म्या तुझे कान किटले कसे ?

राहिलो मी असा हा जसाच्या तसा
हे शिळे चेहरे मात्र नटले कसे ?

जीवना, तू पुन्हा थाप मारू नको
आसवांचे जुने कर्ज फिटले कसे ?

मी तुम्हाला दिली फक्त साधी शिवी
रोज आरोप अन् रोज खटले कसे ?

एकमेका किती घ्याल ओवाळुनी . .
आरतीचे तुम्ही दीप लुटले कसे ?

सभ्य वस्तीत या पाप झाले जिणे
बोलता मी खरे लोक कटले कसे ?

बोल आतातरी . . बोल काहीतरी . .
ऐन वेळी तुझे ओठ मिटले कसे ?

## मेघ

पुन्हा तेजाब दु:खाचे उरी फेसाळुनी गेले
पुन्हा ओठांवरी गाणे तुझे घोटाळुनी गेले

मनाच्या खोल अंधारी कुणाच्या ऐकतो हाका ?
मघाशी कोणते डोळे मला ओवाळुनी गेले ?

कराया लागलो जेव्हा तुझी स्वप्नांसवे चर्चा
खुलासे भूतकाळाचे मला गुंडाळुनी गेले

उपाशी प्रश्न हा माझा उभा आहे तुझ्या दारी–
'कसे तारुण्य ते होते मला जे टाळुनी गेले ?'

पुरे आता पुरे चर्चा सुळाच्या मोजमापाची
( बळीचे रक्तही येथे कधीचे वाळुनी गेले )

कुठे होतीस तू जेव्हा दिशा झंकारल्या होत्या ?
कुठे गेलीस तू जेव्हा ऋतू गंधाळुनी गेले ?

असा काही मला आता जगायाचाच कंटाळा
अता आयुष्यही माझे मला कंटाळुनी गेले !

मला तू सांग आकाशा . . तुझा आषाढ कोणाचा ?
अरे, ते मेघ होते जे घराला जाळुनी गेले !

## पांगळा प्रवास

राहिले रे अजून श्वास किती
जीवना, ही तुझी मिजास किती

आजची रात खिन्न ताऱ्यांची
आजचा चंद्रही उदास किती

मी कसे शब्द थोपवू माझे ?
हिंडती सूर आसपास किती

दु:ख माझे . . विरंगुळा त्यांचा
मी करावे खुळे कयास किती ?

ओळखीचे कुणीतरी गेले . .
ओळखीचा इथे सुवास किती

हे कसे प्रेम ? या कशा आशा ?
मी जपावे अजून भास किती ?

सोबतीला जरी तुझी छाया . .
मी करू पांगळा प्रवास किती ?

## गीते

सोडून तुझा गेलो संसार तुझ्यासाठी
माझी न हवा झाली आधार तुझ्यासाठी

एकेक ऋतू जाई लावून तुला मेंदी
एकेक फुलाचा हा शृंगार तुझ्यासाठी

घेऊन तुला गेले आकाश पहाटेचे
होताच कुठे माझा अंधार तुझ्यासाठी ?

माझ्याच कशा वाटा होतात नकारांच्या ?
एकेक दिशा होई होकार तुझ्यासाठी !

कोठून गडे आणू आयुष्य नवेकोरे ?
देहात पुन्हा होती झंकार तुझ्यासाठी !

दारात जरी आला आषाढ तुझा ओला
गाता न मला आला मल्हार तुझ्यासाठी

माझेच मला झाले काही न कळेनासे . .
घेतात कशी गीते आकार तुझ्यासाठी ?

## पाठ

सोडतांना प्राण त्यांना मी कुठे बोलावले ?
खातरी झाली न त्यांची . . ते घरी डोकावले !

हा कसा झिम्मा विजांशी ओठ माझे खेळती . .
कोणते आकाश माझ्या अंतरी पान्हावले ?

ऐकली आजन्म त्यांची मी शिळी रामायणे
( शेवटी मी बोललो अन् ते किती रागावले ! )

मी न स्वप्नांचे कधीही मान्य केले मागणे
दु:ख माझे एकट्याचे मी कधी लाडावले ?

जीवना रे, एकदाही मी न टाहो फोडला
पाहणाऱ्यांचेच डोळे शेवटी पाणावले !

वेचण्या जेव्हा निघालो माणसांची आसवे
माझियामागे भिकारी शब्द सारे धावले !

वार झेलायास केली मी खुली छाती जरी
नेमके पाठीस माझ्या चावणारे चावले !

## नाते

आले रडू तरीही कोणी रडू नये
कोणीच आसवांच्या हाती पडू नये

कां जन्म घेतला मी ? कां दु:ख भोगले ?
हेही घडू नये अन् तेही घडू नये

जेथे थकून यात्री सारेच बैसले
पाऊल पांगळ्याचे तेथे अडू नये

झालो तुझ्या व्यथांचा केव्हाच लाडका
( तू सांग; का तुलाही आवडू नये ? )

त्यांनी जरी जिभाही छाटून टाकल्या
आवाज श्रृंखलांचा त्यांना नडू नये

व्हावे निरभ्र सारे सांगून एकदा
कोणी असे स्मितांच्या मागे दडू नये

वाऱ्यावरून येती हाका जरी तुझ्या
तू भेटशील तेव्हा मी सापडू नये

आयुष्य पावसाच्या गावात काढले
आता तरी घराने माझ्या झडू नये

सारे सुगंध मीही मागेच सोसले
आता कुण्या फुलाशी नाते जडू नये

# पादुका

तेव्हा सदेह स्वर्गी गेला जरी तुका
येथील भाविकांना भंडावती भुका

सांडोत जेवतांना ताटात आसवे
कोणीच घास अर्धा घेऊ नये सुका

सन्माननीय आता झाले तुझे गुन्हे
अक्षम्य मात्र माझ्या ह्या त्याच त्या चुका

हे खून . . हे दरोडे . . ही लूट . . हे दंगे
हे देवते अता का फोटो तुझा मुका ?

त्यांचाच देश ज्यांच्या ताब्यात भाकरी !
त्यांचेच सत्य ज्यांच्या हातात बंदुका !

चाटून पाय घ्या हो वेळीच नेमके
सोयीनुसार ठेवा पूजेत पादुका !

## कारण

दिशा गातात गीते श्रावणाची
कुणाला याद तान्हेल्या तृणाची ?

कशाला एकमेकांची खुशाली ?
कुणाला काळजी नाही कुणाची

तुझी नाही कुठेही गंधवार्ता . .
तुझी चाहूल ती होती क्षणाची

अरे मी जाळले तारुण्य माझे
अता ही कौतुके साधेपणाची

नको चर्चा नको येथे उन्हाची
फुलांची वेळ ही संभाषणाची

जरी दारापुढे आकाश आले
तुला अद्याप चिंता अंगणाची !

मला येतात भूमीतून हाका . .
कुठे सीता नव्या रामायणाची

मिळाले शब्द हे ज्या कारणाने
गडे, दे कारणे त्या कारणाची !

## झेले

तशा माझ्या चुका झाल्या, तसे मीही गुन्हे केले . .
तसे कित्येकदा मीही मला न्यायालयी नेले !

कुणाचा मंत्र मी घेऊ ? गुरू पापी महारोगी . .
तरीही तीर्थ पायांचे मला देती खुनी चेले !

कधी मी मापला गेलो, कधी मी तोलला गेलो . .
अता माझी कुठे मापे ? तराजू ते कुठे गेले ?

अरे, येथील कैद्यांच्या पिढ्या आल्या तशा गेल्या
मुके ते जन्मले होते, मुकाट्यानेच ते मेले !

जगाने कोरड्या जेव्हा तृषा नाकारली माझी
रित्या पेल्यातुनी माझ्या पुन्हा आले नवे पेले !

दिले माझ्याच दुःखाने तुझे लावण्य शब्दांना
फुलांवाचून मी साऱ्या फुलांचे बांधले झेले

## उजाडल्यावरी सख्या . .

उजाडल्यावरी सख्या निघून जा घराकडे
अजूनही उशीवरी टिपूर चांदणे पडे

उगीच वेळ सारखी
विचारतोस काय तू ?
पुन्हापुन्हा मिठीतही
शहारतोस काय तू ?

पुन्हा अशी हवी तशी कुणास रात्र सापडे ?
उजाडल्यावरी सख्या निघून जा घराकडे

अजून कुंतलात या
तुझा न जीव गुंतला
अजून पाकळ्यांतला
मरंदही न संपला

अजूनही कसे तुझे लबाड ओठ कोरडे ?
उजाडल्यावरी सख्या निघून जा घराकडे

अजून थांब, लागली
जगास झोप आंधळी
दिसेल या नभातही
हळूच रात्र सावळी

तुलामला विचारुनी फुटेल आज तांबडे
उजाडल्यावरी सख्या निघून जा घराकडे

## हारलेले डाव

या नदीच्या पार तेथे एक माझे गाव होते
कोण जाणे हाय तेव्हा काय माझे नाव होते ?

तो कसा बाजार होता ? ती कशी होती दुकाने ?
रक्त होते एक ज्याचे वेगळाले भाव होते

दे शिवी तूही अशी की, जी कुणा ऐकू न यावी
आजचे आहेत साधू—कालचेही साव होते !

प्राण जातांना दग्याचा मी कुठे आरोप केला ?
ओळखीच्या माणसांचे ओळखीचे घाव होते !

ते न होते नेहमीच्या त्याच काव्यांचे पहारे
( ते फुलांच्या लाजण्यांचे लाघवी घेराव होते )

राहिले आयुष्य कोठे लावण्यासाठी पणाला ?
घेतले जे श्वास तेही हारलेले डाव होते

# झंझावात

जगलो असाच कसातरी ओठातल्या ओठात मी
आता कुठे बोलायला केली खरी सुरुवात मी !

झाले कशाचे बोलणे ? केले जरा मन मोकळे !
( जे राहिले सांगायचे ते टाळले अजिबात मी )

माहीतही नाही मला आलो इथे कसा केव्हा
मीही अताशा ऐकतो .. दिसलो म्हणे इतक्यात मी

बसुनी गळेकापूंसवे मी काल मैफल जिंकली
कटला जरी होता गळा उठलो अचानक गात मी

कुठल्याच दारी मी कधी नेली न कागाळी तुझी
नाराज आयुष्या तुझी घालू कशी रुजवात मी ?

तुमची करा आरास अन् तुमचे तुम्ही लावा दिवे
तुमच्यात मी येऊ कसा ? बदनाम झंझावात मी !

मजला असे पाहू नका .. रस्त्यावरी थांबू नका
—धुंडाळतो आहे इथे माझा रिकामा हात मी !

माझ्या भविष्याची मला नाही जराही काळजी
उमटेन या धरतीवरी .. चमकेन त्या गगनात मी !

## लोक

मला गाव जेव्हा दिसू लागले . .
लुळे पाय माझे रुसू लागले !

लपंडाव माझातुझा संपला
तुझे तेच माझे असू लागले !

तुझ्या अंतरी कोणती वादळे ?
मला हेलकावे बसू लागले !

तुझी पाहता पाकळीपाकळी
गडे, पाहणेही फसू लागले

अशी ही कशी तीच ती उत्तरे ?
मला प्रश्न माझे हसू लागले !

कुठे संपल्या रोजच्या यातना ?
पुन्हा हे दिलासे डसू लागले !

कसा मी रडू ? हे कसे लोकही ?
स्वतःचेच डोके पुसू लागले !

## झपाटलेला

हरेक आवाज आज अर्ध्यात छाटलेला
हरेक माणूस आज आतून फाटलेला

म्हणू नका की, मला कधीही रडू न येई
गळ्यात या हुंदका न माझाच दाटलेला

अता जरी हे उदास आनंद सोबतीला
पुन्हापुन्हा आठवे मला काळ काटलेला

कधी न मी सापडेन माझ्या घरी कुणाला
असेन या सामसूम लोकांत वाटलेला

तुम्हीच माझे हिरावले ओठ अन् तरीही
मलाच माझा सुनावता शब्द लाटलेला

जिथेतिथे आरती सुखाच्या सजावटीची
घरोघरी नाईलाज रेखीव थाटलेला

अता किती खोलखोल ही अंतरे तपासू ?
झरा झरा झुळझुळून केव्हाच आटलेला

अरे कुणी चोरला उद्याचा पहाटतारा ?
उजेड येई दिव्यादिव्यातून बाटलेला

उगाच घालू नका गुलाबी मला उखाणे
तुम्ही धरा वाट आपुली—मी झपाटलेला !

## काचपात्रे

ही शूर काचपात्रे गाती जरी पवाडा
घेऊ नये बुडांचा कोणी कधीच झाडा

घाई करून घ्यावी त्यांची प्रमाणपत्रे
( मागून न्याय होतो आधी मिळे निवाडा ! )

प्रत्येक फ्लॅटमध्ये आता रवी उदेला . .
ते सोसतीच कैसे हिमशीत हा उकाडा ?

त्रेतायुगातुनी हे शिस्तीत संत आले
व्हा दूर घामटांनो, घालू नका गराडा !

त्यांना सलाम ज्यांनी सुकुमार बंड केले
( आता अम्हास फाशी ! केला अम्हीच खाडा ! )

ते जन्मताच त्यांच्या हाती गुलाब होते . .
आम्हा भिकारड्यांना हे पोट ! हा रगाडा !

त्यांच्या सुखावलेल्या दुःखास चीड आली
( झाला जरा उशीरा, पण शोभिवंत राडा )

भयमुक्त गोजिऱ्यांनी स्वातंत्र्य धन्य केले
ही भाकरीच साली आमचा करी चुराडा

## हूल

उंबऱ्याने ' नको रे ! ' म्हणावे
अंगणानेच का गुणगुणावे ?

आठवेना कधी प्रेम केले . .
चांदण्यालाच का आठवावे ?

देश आहे जरी हा फुलांचा
हे उन्हाच्या घरांचे विसावे !

श्वास हे श्वास नाहीत माझे . .
हे तुझ्या लाजण्याचे सुगावे !

साक्ष काढू कशी आसवांची ?
मागती लोक खोटे पुरावे !

सोसतो हा कसा आरसाही
अंगओले तुझे बारकावे

भेटतो कोण येथे कुणाला ?
भेटती एकमेका दुरावे !

धन्य झाले तुरुंगात कैदी . .
शृंखलांची किती गोड नावे !

गाव माझे मला सापडेना
हूल देतात सारीच गावे !

## निष्कर्ष

जगाची काळजी संभावितांना
– कण्हाया लागती दारू पितांना !

तसा झुंजार तो नावाजलेला
( तसा नावाजला गेला भितांना )

अहो ह्या पंगतीला अंत नाही
. . अता पत्रावळी खाती शितांना !

भुकेलेल्या, तुझी पूजाच खोटी
हवे अश्रू तिच्या दैवी स्मितांना

दगा केला पुन्हा सामुद्रिकांनी
चला शोधू फरारी भाकितांना !

कसे ते झुंजले प्रस्थापितांशी ?
विचारा ह्या नव्या प्रस्थापितांना !

दिसे हे रक्त साध्या माणसांचे
( कुणी मारी न चाकू प्रेषितांना )

इथे ज्वाळांविना काहीच नाही
फुले मागू नये कोणी चितांना !

## प्रशंसा

बेरका होता दिलासा . . मानभावी धीर होता
पाठ राखायास माझी लाघवी खंजीर होता

चार शब्दांनीच आले का तुझ्या डोळ्यात पाणी ?
सोड त्याचे बोलणे . . तो एक वेडापीर होता !

शेवटी सोयीप्रमाणे शोधले त्यांनी बहाणे
–हा असा लाचार होता, तो तसा दिलगीर होता

काय माझ्या सोसण्याची एवढी झाली प्रशंसा ?
काय माझ्याहून माझा हुंदका खंबीर होता ?

मी जरी हासून आता बोलतो आहे ऋतूंशी,
ऐन तारुण्यात माझा चेहरा गंभीर होता !

## दावे !

आरशांचेच दावे खरे !
चेहऱ्यांनाच गेले चरे

तू शहाण्यापरी हो मुका
बोलणाराच वेडा ठरे !

प्रश्न सारेच संतापले
( मी नको ती दिली उत्तरे ! )

माणसांना कुठे आसरा ?
श्वापदांची गुलाबी घरे !

जन्मलो अन् शिकू लागलो
आसवांचीच आद्याक्षरे !

राहिला केर काढायाचा
काळजांचे किती कोपरे !

## डंका

जेव्हा लढाईचा खरा डंका झडाया लागला
आपापल्या तंबूमध्ये जो तो दडाया लागला

माझा अखेरीचा अता घेऊ कसा हा घोट मी
हातातला पेला पुन्हा खाली पडाया लागला

ह्या पांगळ्या पायांसवे मी चाललो होतो जरी
बेमान आयुष्या अता रस्ता अडाया लागला

गेला वधस्तंभाकडे कैदी सुखाने शेवटी
(ज्याने दिली होती सजा तो आवडाया लागला)

त्याला न आले बोलता आजन्म ज्याने सोसले
ज्याला हवे ते लाभले तो ओरडाया लागला

वाया न गेले शेवटी जे रक्त माझे सांडले
माझा जुना मारेकरी आता रडाया लागला

## सकाळीच

झिंगतो मी कळेना कशाला
जीवनाचा रिकामाच प्याला !

दूर झाले फुले वेचणारे
वेचतो मी फुलांतील ज्वाला

ही न वाणी तुझ्या वेदनेची
हा सुखाचा तुझ्या बोलबोला !

' काय झाले पुढे आसवांचे ? '
हे विचारू नये सांत्वनाला

राहिलो दूर तू . . मी . . तरीही
एक स्पर्शाविना स्पर्श झाला

गाव सारेच हे तोतयांचे
नाव माझे विचारू कुणाला ?

काढली रात्र जागून सारी
चंद्र माझा सकाळीच आला !

# चरे

फाटके संसार ज्यांचे . . मोडकी ज्यांची घरे . .
त्याच लोकांना उद्याची मागतो मी उत्तरे !

काय हे जातील वाया खापराचे हुंदके ?
पाडले जातील केव्हा काचपात्रांना चरे ?

माझिया हाती जगाने दीप दुःखाचा दिला . .
ओळखू येतात आता चोरलेले चेहरे !

गोजिरे हे शब्द ह्यांचे देखणे देती दगे
ही कशाची माणसे ? हे बोलणारे पिंजरे !

शोधतो ज्या अंबराला दूर ते अद्यापही
माझियामागून येती नेहमीची अंबरे !

ह्याच का तो 'हात' ज्याने कापला माझा गळा ?
ह्याच हातातून ताजे रक्त माझे पाझरे !

कालचे सारे लफंगे बैसले सिंहासनी
ढाळतो आम्ही भिकारी लक्तरांची चामरे !

लोक हो, आकाशवाणी देत नाही भाकरी
देव केव्हा माणसांशी बोलला आहे खरे ?

## रिक्त

उगिच बोलायचे, उगिच हासायचे
उगिच कैसेतरी दिवस काढायचे

मधुन जमवायचे तेच ते चेहरे
मधुन वाऱ्यावरी घरच उधळायचे

चुकुन अपुली कधी हाक ऐकायची
मन पुन्हा बावरे धरुन बांधायचे

रडत राखायची लोचने कोरडी
सतत कोठेतरी भिजत धुमसायचे

उगिच शोधायचे भास विजनातले
अटळ आयुष्य हे टळत टाळायचे

ह्या इथे ही तृषा कधि न भागायची . .
मीच पेल्यातुनी रिक्त सांडायचे !

## मी नाही !

जिवंत कोण ? कुणालाच बातमी नाही
दिसे हरेक तरी . . सावली हमी नाही

किती धुवाल तुम्ही रक्त शेवटी अमुचे
पचेल खून असा रंग मोसमी नाही

जपून वेच, फुले ही जनवरांसाठी
अरे, वसंत असा येत नेहमी नाही !

अम्हास रोज तुझे शब्द सांगतो वारा
तुला कळेल . . तुझी श्रृंखला घुमी नाही

धनुष्यबाण जरी शोधशोधतो आम्ही
कसे अरण्य ! इथे एकही शमी नाही !

दिलास तूच मला तूच हा रिता पेला
नसेल थेंब, तरी धुंद ही कमी नाही !

विचारतेस कशी बावरून ताऱ्यांना . .
घरासमोर तुझ्या चांदण्यात मी नाही !

## जानवी

सांगा कुणीतरी या आकशखाजव्यांना –
" मातीच मोक्ष देई कंगाल नागव्यांना ! "

आहे जरी उभा मी निष्पर्ण माळरानी
या स्वप्नपाखरांच्या रोखू कसा थव्यांना ?

आली नव्या जगाची आली पहाट आली
आता उन्हात आणू पाळीव काजव्यांना !

येती जरी समोरी सारे नकोनकोसे
मीही नकोनकोसा झालो हव्याहव्यांना

साधाच मी भिकारी, माझी रितीच झोळी
गावात मान त्यांच्या श्रीमंत जोगव्यांना !

प्रत्येक आतड्याचा मी पीळ होत आहे
ते मात्र गाठ देती त्यांच्याच जानव्यांना !

## झुंज

हारण्याची खंत नाही, हारणे जिंकून जाई
आजची ही झुंज नाही—ही उद्याची हातघाई

जिंकणाऱ्यांनाच आता वाटते भीती जयाची
हारणाऱ्यांनी न केली बंद केव्हाही लढाई

जे सुळी गेले तयांची झुंजती अद्याप स्वप्ने
(वाचण्यासाठीच आता जिंकणाऱ्यांची बढाई)

जिंकणाऱ्यालाच अंती आठवे भाषा तहाची
हारणाऱ्याची न थांबे हारतांनाही चढाई

लावती प्रत्येक वेळी जिंकणारे जाहिराती
वाढते प्रत्येक वेळी हारणाऱ्यांची धिटाई !

जिंकणाऱ्यांना कधीही जिंकता आलेच नाही
अन् जितांच्या हारण्याला भूतकाळाची मनाई

हारणाऱ्यांनी कधी का टाकले हत्यार खाली ?
माणसाचे दुःख नाही एक भाड्याचा शिपाई !

# चाळा

भाजुनी गेला मला तेव्हा उन्हाळा !
कोरडा आला अता हा पावसाळा !

चंद्र येथे पाहिला नाही कुणीही
येथले आकाश काळे . . सूर्य काळा

ह्या सुखी भिक्षेकऱ्यांची ही अगत्ये
हा नसे कंगाल लोकांचा जिव्हाळा !

घेतले नाही कुणीही सोबतीला
राहिला रस्त्यावरी माझा धुराळा

लोक माझा चेहरा पाहून जाती
चेहऱ्यापासून मी नामानिराळा

मी तुला सोशीन आयुष्या कसाही
श्वास घेण्याचा मला प्राचीन चाळा !

## साय

आसवांनी मी मला भिजवू कशाला ?
एवढेसे दुःख मी सजवू कशाला ?

लागले वणवे इथे दाही दिशांना . .
एक माझी आग मी उजवू कशाला ?

बोलका संताप मी साऱ्या मुक्यांचा
तापलेले ओठ मी बुजवू कशाला ?

मी असा कलदार कोठेही . . कधीही
पावल्याचवल्यांस मी खिजवू कशाला ?

मी उन्हाचा सोबती घामेजलेला
चंद्रमा प्राणात मी रुजवू कशाला ?

रात्र वैऱ्याची . . पहारा सक्त माझा . .
जागणारे शब्द मी निजवू कशाला

साय मी खातो मराठीच्या दुधाची
मी कुणाचा उंबरा झिजवू कशाला ?

## सुन्यासुन्या मैफलीत

सुन्यासुन्या मैफलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे
अजूनही वाटते मला की, अजूनही चांदरात आहे

उगीच स्वप्नात सावल्यांची कशास केलीस आर्जवे तू ?
दिलेस का प्रेम तू कुणाला तुझ्याच जे अंतरात आहे ?

कळे न तू पाहशी कुणाला ? कळे न हा चेहरा कुणाचा ?
कसा तुला भास होत आहे–तुझे हसू आरशात आहे !

उगाच देऊ नकोस हाका, कुणी इथे थांबणार नाही
गडे पुन्हा दूरचा प्रवासी कुठेतरी दूर जात आहे

सख्या तुला भेटतील माझे तुझ्या घरी सूर ओळखीचे
उभा तुझ्या अंगणी स्वरांचा अबोल हा पारिजात आहे !

## कुत्रे

एकमेकांना कसे हे चावती कुत्रे
हाडकांसाठी कसे हे भांडती कुत्रे

हालती या शेपट्याही नेमक्या वेळी
हे जरी संतापलेले वाटती कुत्रे

जन्मले कुत्रे कधी का गर्जण्यासाठी ?
लोकहो, ऐका जरा – हे भुंकती कुत्रे !

का करावी माणसांनी एवढी चिंता
एकमेकांना जरी हे फाडती कुत्रे

जी मिळे ती घाण खाती रोज कोठेही
मात्र दिल्लीचाच साबू मागती कुत्रे

प्रश्न हा जो तो विचारू लागला आहे—
" पाय कोणाचे अता हे चाटती कुत्रे ? "

हाय, कुत्र्याचा निघाला शेवटी पंजा
नाव सिंहाचे जरी हे सांगती कुत्रे

हा जुना कुत्रा असो वा तो नवा कुत्रा
शेवटी कुत्र्याप्रमाणे वागती कुत्रे !

## बोलणी

आसवांच्या सरी बोलती
मी न बोले, तरी बोलती

ऐक डोळेच माझे अता . .
ओठ काहीतरी बोलती

संत मोकाट बेवारशी
सांड संतांपरी बोलती

बांधती चोर जेव्हा यशे
'ही कृपा ईश्वरी !' बोलती

शांत काटे बिचारे परी
ही फुले बोचरी बोलती

तेच सापापरी चावती
जे असे भरजरी बोलती

रोग टाळ्या पिटू लागले–
"छान धन्वंतरी बोलती !"

झुंजणारे खुले झुंजती
बोलणारे घरी बोलती !

## नामांतर

राख सांभाळून ठेवा राख झालेल्या घराची . .
संपली नाही लढाई यार हो नामांतराची !

ह्या भिकारी भामट्यांची जिन्दगी आहे कितीशी ?
वाजते जोरात पुंगी चोरलेल्या गाजराची !

संतहो, आम्ही जरी हे जन्मण्याचे पाप केले
लागली नाही अम्हाला लूत रोगी ईश्वराची

काय न्यायाचा निवाडा एवढा दुर्बोध होता ?
ही कशी आताच झाली मागणी भाषांतराची ?

कालही अंधार होता . . आजही अंधार आहे . .
काय सूर्यालाच दारे बंद झाली अंबराची ?

चालती रेतीवरी ही मोडकी त्यांची जहाजे
पाहिली कोठे तयांनी लाट साधी सागराची ?

कालच्यापेक्षा दयाळू हा नवा आला कसाई
घालतो गाईस हाडे कापलेल्या वासराची !

जे उद्या होणार त्याचा आज मी आहे पुरावा
घे भविष्या नोंद माझ्या बोलक्या हस्ताक्षराची !

## ते हेच !

खोटे हसू , खोटे रडे, खोटीच ही संभाषणे
येथे जगावे लागते खोट्यांसवे खोटे जिणे

ह्यांच्या खऱ्या या नोकऱ्या ! ह्यांचे खरे हे बंगले !
ह्यांचे सुखाचे हुंदके . . यांची गुलाबी भांडणे !

हे गर्जती तेव्हा पडे न्हाणीघरांना काळजी
हे कुंथती तेव्हा बने ह्यांच्या चहाचे चांदणे

ते हेच ते सर्वज्ञ जे देती दिशेलाही दिशा
ह्यांच्याच व्याख्यांची उभी दाही दिशांना कुंपणे !

प्रत्येक सत्याने जणू ह्यांची अनुज्ञा घेतली
प्रत्येक क्रांतीला करी संपूर्ण ह्यांचे भुंकणे !

## साफसाफ

कुठलेच फूल आता मजला पसंत नाही
कळते मला अरे हा माझा वसंत नाही

हा कालच्या विषाचा दिसतो नवीन प्याला
समजू नकोस माझ्या फसण्यास अंत नाही

जमवूनही तुझ्याशी माझेतुझे जमेना
इतका तुझ्याप्रमाणे मी शोभिवंत नाही

मी सोडणार नाही हे गाव आपल्यांचे
सारीच माणसे अन् कोणीच संत नाही

थकुनी किती प्रवासी पडले धुळीत मागे . .
रस्त्यास वाहणाऱ्या कसलीच खंत नाही

मजला दिलेस कां तू वरदान विस्तवाचे ?
दुनिये, अता रडाया मजला उसंत नाही

दारात दुःखितांच्या मी शब्द मागणारा
( तितकी अजून माझी कीर्ती दिगंत नाही )

मी रंग पाहिला ह्या मुर्दाड मैफलीचा . .
कुठल्याच काळजाचा ठोका जिवंत नाही !

## पालखी

अताच कोठे मनात माझ्या तुझ्या रुपाची पहाट झाली
दवारले फूल काळजाचे, हळूच जन्मास जाग आली

उजाड हा माळ अन् इथेही मला तुझ्या भेटतात हाका . .
अजून रेंगाळतो तुझा हा सुगंध माझ्या सभोवताली

निघून केव्हाच काळ गेला कुणास काही म्हणावयाचा
( कधीकधी मात्र वारियाला विचारतो मी तुझी खुशाली )

कुठून साधेच लोक आले मला पुन्हा धीर द्यावयाला ?
अनोळखी आसवात माझी मला पुन्हा आसवे मिळाली !

कशा तुला सोडुनी जिवाच्या सख्या तुझ्या तारका निघाल्या
खुशाल आकाश पीत आहे तुझ्याच ओठांमधील लाली

अताच रक्तात आठवांनी शहारुनी किलबिलाट केला
गडे पुन्हा आज डोळियांची तुझ्याकडे पालखी निघाली

## दर्जेदार

ती कुणाची झुंज होती ? तो कसा जोहार होता ?
जो निखारा वेचला मी तो निखारा गार होता !

हा कसा आता उन्हाचा निर्दयी पाऊस आला ?
मी मघाशी पाहिलेला मेघ काळाशार होता !

गांजले ज्यांनी मला ते शेवटी माझेच होते..
हा कळीचा दंश होता ! तो फुलाचा वार होता !

ह्या करंट्यांनी स्वतःचे फोडले आधीच डोळे..
(त्यांचियासाठी उद्याचा सूर्य अत्याचार होता !)

स्वागतासाठीच माझ्या थुंकले ते आदराने
थुंकले तोंडावरी तो केवढा सत्कार होता !

गाडल्या त्यांनी पिढ्या अन् ठेवला नाही पुरावा
ह्या स्मशानाच्या धन्यांचा देव ताबेदार होता !

लागला आहे अताशा वेदनेचा शौक त्यांना
(एरवी, त्यांचा सुखाचा चोरटा व्यापार होता !)

चोरली माझ्या घराची राखही त्याने परंतू
मी न केला ओरडा.. तो चोर अब्रूदार होता !

पाहिला नाही जरी मी चेहरा मारेकऱ्याचा
लोकहो, माझा तरीही खून दर्जेदार होता !

## अवेळ

मी कशी प्रीती कराया लागलो
सावलीसाठी झुराया लागलो

हात जेव्हा मोकळा केलास तू
हात वाऱ्याचा धराया लागलो

का गडे नाही तुलाही कल्पना
मी तुझ्या ओठी उराया लागलो

ऐकती ओसाड झालेल्या दिशा . .
मी कशाला हंबराया लागलो ?

या विषाचे नाव सांगा कोणते ?
मी पुन्हा पेला भराया लागलो !

केवढा हा पूर अन् घाई तुला
हा पहा मी ओसराया लागलो

लागली आता फुलांना काळजी
( मी अवेळी मोहराया लागलो )

## दळण

जितके जगावयाचे तितके जगून झाले
फिरते उगीच जाते .. जगणे दळून झाले !

आतापर्यंत मीही जगलो कसा कळेना
असणे नसून झाले–नसणे असून झाले

हे अस्तनीतले अन् ते मात्र नेहमीचे
जे ओळखावयाचे ते ओळखून झाले

कण्हते उगीच आता ही धूळ यौवनाची
केव्हाच स्वप्नसाक्षी आकाश जून झाले

आता उगाळतो मी हा कोळसाच माझा
आभास पेटल्याचे तेव्हा चुकून झाले

तुमच्या खिशात ठेवा तुमचे रुमाल कोरे
( आताच आसवांनी डोळे पुसून झाले ! )

तूही उशीर केला नाहीस का जरासा ?
आताच जीवनाला " नाही ! " म्हणून झाले !

## सांगावा

संपला अता माझा श्वास घ्यायचा दावा
राहिला जगायाचा हा उदास देखावा !

हा असा जरी माझा जन्म वादळी गेला
सोसवे न थोडासा का तुझाच हेलावा ?

ही न आग दुःखाची . . ही न जाग सत्याची . .
हा हुशार शब्दांचा अर्थहीन मेळावा !

हे मला नवे नाही कोरडे तुझे हासू
आसवांत माझ्याही राहिला न ओलावा !

कोणत्या वसंताचा पाठलाग मी केला ?
भेटला सुगंधाचा हा अखेर कांगावा !

लेखणीतुनी माझ्या हुंदका तुझा आला . .
अक्षरांतुनी आला पाझरून सांगावा !

# आभार

मेल्यावरी जगाचे आभार मानले मी
जाऊ दिले मला हे उपकार मानले मी

तेव्हा ज़री जरासा होतो . . जिवंत होतो
सारेच श्वास खोटे उपचार मानले मी

केव्हाच सांत्वनांची केली न मी अपेक्षा
अपुल्याच आसवांना नादार मानले मी

होत्या सुन्या घराच्या भिंती विवंचनांच्या
बाहेरच्या बिळांना शेजार मानले मी

माझ्याच बोलण्याशी आजन्म बोललो मी
विजनातल्या हवेला संसार मानले मी

आयुष्य संपतांना इतकीच खंत होती–
काही भिकारड्यांना दिलदार मानले मी !

माझ्या पराभवाची समजूत घातली मी
जे वार खोल गेले, ते यार मानले मी

प्रत्येक आरतीच्या तबकात मीच होतो !
प्रत्येक तोतयाला अवतार मानले मी !

## निरोप

का म्हणून मी आता शब्द आवरू माझे ?
या विराट सत्याशी बोलणे सुरू माझे !

गुणगुणावया आता वेळ राहिला नाही . .
कोणत्या रित्या देही सूर मी भरू माझे ?

मी उडून जाणारा सैरभैर पाचोळा
कोणते जपायाला पान मी धरू माझे ?

एक रान श्वासांचे . . एक रान भासांचे . .
भिरभिरे कुण्या रानी विद्ध पाखरू माझे ?

मैफलीत केव्हाची पैंजणे मुकी झाली . .
गालिच्यावरी वाजे एक घुंगरू माझे !

ह्या धुळीवरी माझ्या राहिल्या न रेघोट्या . .
का पुसून गेलेले नाव मी स्मरू माझे ?

बंद का घरे सारी ? माणसे कुठे गेली ?
अंगणात कोणाच्या प्राण आंथरू माझे ?

मी निरोपही साधा घेतला न स्वप्नांचा . .
काय मी करू त्यांचे ? काय मी करू माझे ?

## नाबाद

तुम्ही काय म्हणता याचा मज विषाद नाही
मी जिवंत आहे–माझा हा प्रमाद नाही !

ज्यासत्यास उपकारांची तोंडपाठ यादी . .
मी कृतघ्न, माझ्या ओठी धन्यवाद नाही !

मैफलीत मंबाजींच्या का म्हणून बोलू ?
कुणालाच कोणाचीही इथे दाद नाही

अरे, तुझ्या संतापाचा हा कसा पुरावा ?
ही प्रदीर्घ किंकाळी, हा सिंहनाद नाही !

हा अथांग सागर उसळे जरी यातनांचा
परत मी घरी जाणारा सिंदबाद नाही !

तुला मीच रडतारडता धीर देत आहे
वादग्रस्त माझे अश्रू ह्यात वाद नाही !

कुणी घाव केला तेव्हा मला आठवेना
पुढे काय झाले माझे ? मला याद नाही !

सावकाश आयुष्याचा खेळ खेळलो मी
बाद होत गेले सारे, मीच बाद नाही !

## पुण्याई

चंद्र राहिला नाही भाबड्या चकोरांचा
चांदण्यावरी ताबा आजकाल चोरांचा

लागले न झाडांना दोनचार शिंतोडे . .
नाचही सुरू झाला जंगलात मोरांचा !

मी अजूनही येथे श्वास घेतला नाही
( दे सुगंध थोडासा कालच्या फुलोरांचा ! )

मांडले कुणी येथे आज ताट सोन्याचे ?
आठवे न रामाला द्रोण रानबोरांचा !

मी तुझ्या क्षणासाठी हात घेतला हाती . .
कायदा कसा पाळू मी तुझ्या बिलोरांचा ?

राहिली जगी माझी एवढीच पुण्याई—
मी न सोयरा झालो ह्या हरामखोरांचा !

REFBK-0024116
REFBK-0024116
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५००
दा. क्र. २७११६
काव्य १७१२५
मुख्य शाखा (स्थळ प्रत)